**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३०६/०२**

श्री. निलेश टी.मांजवकर, ------ **अपीलकर्ता**
बी/४, सुवर्ण- अमृत सी.एच.एस.लि.
गंगा जमुना सिनेमा समोर,
ताडदेव, मुंबई-४०० ००७.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक, (ई.एस.ॲन्ड पी.)
एफ.ए.ए. ३ रा मजला,
बृहमुंबई महापालिका कार्यालय,विस्तार बिल्डिंग,
मुंबई-४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य अभियंता, (बी.पी.),सिटी,
ई वॉर्ड, म्युनिसिपल ऑफीस, ३ रा मजला,
१०,एस.के.हफिझुद्दीन मार्ग,
भायखळा, मुंबई-४०० ००८.
. -----**उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. निलेश मांजवकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव (शहर) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक ६.७.२००६ रोजी अर्ज करुन मलबार हिल विभागातील इमारत/ प्रकल्पाच्या कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दिनांक ९.८.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती देण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश देऊनही जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दिनांक १५.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांच्यावतीने कार्यकारी अभियंता, इमारती व प्रकल्प (सी), श्री.ए.एस.शेख, तसेच अपिलकार श्री.निलेश मांजवकर हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.निलेश मांजवकर यांनी माहितीच्या अधिकारात दिनांक ६.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव (शहर) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) मलबार हिल विभाग ताडदेव, मुंबई येथील बिल्डिंग फाईल क्र.इबी/७६८७/डीए-१३/१/०३ च्या ताबा प्रमाणपत्राची तसेच मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या प्लॅनच्या साक्षांकित छायाप्रती.

(२) वरील प्रकल्पास दिलेल्या बी.सी.सी.संबंधीच्या फाईल क्र.इबीपी (सी) ७६८७ च्या साक्षांकित छायाप्रती.

(३) मलबार हिल विभागातील सीटी सर्व्हे क्र.३/६५९ या प्लॉटवरील बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या क्लब हाऊसच्या प्लॅनच्या साक्षांकित छायाप्रती.

(४) मलबार हिल विभागातील सीटी सर्व्हे क्र. ३/६५९ या प्लॉटवरील बृहन्मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या तांत्रिक शाळेच्या प्लॅनच्या साक्षांकित छायाप्रती.

(५) मलबार हिल विभागातील सीटी सर्व्हे क्र. ३/६५९ या प्लॉटवरील गमाडीया कॉलनीची संपूर्ण फाईलची तपासणी करण्यासाठी फाईल उपलब्ध करुन देणे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) अनुसार जन माहिती अधिका-याने ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असूनही सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधील मागितलेली माहिती दिली नाही.

जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.९.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. अपिलकाराने मागितलेली माहिती विहित वेळेत दयावी. भविष्यात याबाबत काळजी घ्यावी. आवश्यक फाईलचा जाणिवपूर्वक कसून शोध घ्यावा व अपिलकारास दोन आठवडयात माहिती दयावी. तसेच अपिलकाराच्या मागणीनुसार संबंधित फाईल तपासणीसाठी अपिलकारास उपलब्ध करुन दयावी असे जन माहिती अधिका-यास आदेश दिले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार संबंधित फाईलचा कार्यालयातील कर्मचा-यांच्या मदतीने जाणिवपूर्वक कसून शोध घेऊन संबंधित फाईल उपलब्ध झाल्यानंतर तसे आपणास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. २१.९.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने अपिलकारास अद्याप मागणीप्रमाणे माहिती दिलेली नाही. या परिस्थिती मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेल्या चारही मुद्दयांबाबतची माहिती हे

आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. संबंधित फाईलही मागणीनुसार तपासणीकरिता अपिलकारास द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**-आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३०९/०२**

श्रीमती मंगेश पंडित, ------ **अपीलकर्ता**
७, सीता बिल्डिंग, न्यु बदामवाडी,
व्ही. पी. रोड, मुंबई-४०० ००४.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, डी-१ विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड,
मुंबई-४०० ०३४.

जन माहिती अधिकारी तथा
कार्यासन अधिकारी, डी-१ विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड,
मुंबई-४०० ०३४.
.
. **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्रीमती मंगेश पंडित यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम ३ अनुसार विहित केलेल्या जोडपत्र-अ च्या नमुन्यात जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, डी-१ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचेकडे दिनांक ३.३.२००५ रोजी अर्ज करुन सीता बिल्डिंगची १९९० साली N.O.C. रद्द केल्यानंतर दुरुस्ती मंडळाने केलेल्या दुरुस्ती कामाचे व २००४ ते २००५ या कालावधीतील दुरुस्ती कामाच्या कागदपत्रांची मागणी केली होती. माहिती अपूर्ण दिल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, श्री.प्रमोद अ.सावंत, तसेच अपिलकार श्रीमती मंगेश पंडित हया हजर होत्या.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती मंगेश पंडित यांनी माहितीच्या अधिकारात दि.३.३.२००५ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, डी-१, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे व्ही.पी.रोडवरील न्यू बदामवाडी येथील सीता बिल्डिंगच्या दुरुस्ती बाबतच्या कागदपत्रांची मागणी केली होती. सीता बिल्डिंगच्या दुरुस्ती बाबतची कागदपत्रे घेण्यास जन माहिती अधिका-याने दि. ६.६.२००६ रोजी दुपारी ४.०० ते ५.०० या वेळेत त्यांचे कार्यालयात अपिलकार श्रीमती मंगेश पंडित यांना बोलाविले होते. त्यानुसार मागणी केलेली कागदपत्रे घेण्याकरिता अपिलकार कार्यालयात गेल्या होत्या. जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी यांनी श्री.मेहेर यांना संबंधित फाईल देण्यास सांगितले. श्री.मेहेर यांनी फाईल दिली. परंतु थोडयाच वेळात त्या कार्यालयातील एका व्यक्तिने अपिलकाराच्या हातातून फाईल खेचून घेतली.त्यानंतर बरीच वादावाद झाली. अखेरीस त्या फाईलमधील २००४ ते २००५ या कालावधीतील दुरुस्तीच्या कामाची कागदपत्रे शुल्क घेऊन अपिलकारास देण्यात आली. १९९० मध्ये एन.ओ.सी.रद्द केल्यानंतर दुरुस्ती मंडळाने केलेल्या सीता बिल्डिंगच्या दुरुस्तीच्या कामाची कागदपत्रे अपिलकारास दिली नाहीत.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी म्हणून कार्यासन अधिकारी, डी-१ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, हे एकटेच काम पहात आहेत. सीता बिल्डिंगची १९९० या वर्षी एन.ओ.सी.रद्द केल्यानंतर दुरुस्ती मंडळाने केलेल्या दुरुस्ती कामाच्या कागदपत्रांच्या प्रती अपिलकारास दिलेल्या नाहीत असे दिसते. या परिस्थिती जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी यांना मी असे आदेश देतो की, अपिलकारास सीता बिल्डिंगची दुरुस्ती कामाची संबंधित फाईल पहाण्यासाठी उपलब्ध करुन दयावी. मागणीप्रमाणे साक्षांकित छायाप्रती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**-आदेश -**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३२२/०२**

डॉ. रुस्तम सोनावाला, ------ **अपीलकर्ता**
६२०, दुसरा मजला,
पारसी कॉलनी, जामा जमशेट रोड,
दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक,
एच/बेस्ट विभाग, ४ था मजला, सहकार बाजार बिल्डिंग,
वांद्रे स्टेशन पलिकडे, वांद्रे (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधकांचे कार्यालय,
एच/बेस्ट विभाग, ४ था मजला, सहकार बाजार बिल्डिंग,
वांद्रे स्टेशन पलिकडे, वांद्रे (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०.
.

**-----उत्तरवादी**

**<u>- वि वे च न -</u>**

अपिलकार डॉ. रुस्तम सोनावाला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम ३ अनुसार विहित केलेल्या जोडपत्र-अ च्या नमुन्यात दि. ३.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, एच/पाश्चिम विभाग, मुंबई यांचेकडे अर्ज करुन मंगल भावना को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.खार (पश्चिम), मुंबई या संस्थेच्या नोंदणीच्या वेळेस सहभागी झालेल्या सभासदांची यादी तसेच नवीन सभासदांच्या यादीच्या साक्षांकित छायाप्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने दि. १५.११.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचेकडे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(१) अन्वये महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम ५ (१) नुसार जोडपत्र ब च्या नमुन्यात दिनांक १०.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १९.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, एच विभाग, मुंबई तसेच अपिलकार श्री.रुस्तम सोनावाला हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ.रुस्तम सोनावाला यांनी माहितीच्या अधिकारात दिनांक ३.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडे अर्ज करुन मंगल भावना को.ऑप.हौसिंग सांसायटी लि.खार (पश्चिम), मुंबई या संस्थेच्या नोंदणीच्या वेळेस सहभागी झालेल्या सभासदांची यादी तसेच नवीन सभासदांच्या यादीच्या साक्षांकित छायाप्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने संस्थेच्या नोंदणीच्या वेळेस सहभागी झालेल्या सभासदाची यादी नमुना अ ची प्रत दि.१५.११.२००६ च्या पत्रासोबत अपिलकारास उपलब्ध करुन दिली. तसेच नवीन सभासदांची यादी संस्थेकडून प्राप्त करुन देण्यात येईल असे अपिलकारास कळविले. परंतु अपिलकारास नवीन सभासदांची यादी उपलब्ध करुन दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एच विभाग, मुंबई यांचेकडे दिनांक १०.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. मागितलेली माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी एकच आहेत. प्रथम अपिलावर अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, अपिलकारास माहिती दिली नाही. राज्य माहितीच्या आयोगाच्या सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-याने लेखी अहवाल सादर केला. त्यामध्ये मंगल भावना को.औप. हौंसिंग सोसायटी लि. खार, मुंबई या संस्थेच्या नोंदणीच्यावेळी सहभागी झालेल्या सभासदांची यादी नमुना अ ची प्रत अपिलकारास दि. ९.६.२००८ च्या पत्रासोबत त्याचें राहत्या पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठविण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास अपूर्ण माहिती दिली. संस्थेच्या नवीन सभासदांची यादीची प्रत दिली नाही असे दिसून येते. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांना मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा.

**-आदेश -**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२९८/०२**

श्रीमती पद्मा यशवंत जावळे, ------ **अपीलकर्ता**
तळमजला, टाईम फिल्ड कॉर्पोरेशन,
सी.टी.एस.नंबर ७५६, ७५६-१ ते २३,
प्लॉट नं.२३ ब/२, सुभाष रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर निबंधक (वसूली व नियोजन),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई विभाग,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जीपीओ समोर,
फोर्ट, मुंबई-४०० ००१..
. **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्रीमती पद्मा यशवंत जावळे यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस यांच्याकडे दिनांक २६.९.२००६ रोजी अर्ज करुन श्री संकल्प को.ऑप.हौसिंग सोसायटीची नोंदणी फाईल तपासणीकरिता मागितली होती. सदर फाईल सन १९९८ ते ९९ च्या कालावधीत असल्याने अभिलेख कक्षातून आणण्यासाठी विलंब लागणार असल्यामुळे सदर धारिका प्राप्त होताच आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.१९.१०.२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. यावर समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ८.२.२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-याने तपासणीकरिता कागदपत्र उपलब्ध करुन दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.१८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी हजर झाले नाहीत. अपिलकार श्रीमती पद्मा जावळे सुनावणीकरिता हजर होत्या.

अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती जावळे यांनी जन माहिती अधिका-यांकडे दि.२६.९.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन श्री संकल्प को.ऑप.हौसिंग सोसायटीची नोंदणीची फाईल तपासणीकरिता उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती ही अपील क्र.२०८/९८ व अपील क्र.९६/९९ या संदर्भातील आहे.सदर धारिका सन १९९८-९९ च्या कालावधीतील असल्यामुळे त्या अभिलेख कक्षात असून अभिलेख कक्षातून धारिका काढण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. तरी अभिलेख कक्षातून धारिका प्राप्त होताच उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने दि.१९.१०.२००६ च्या पत्रान्वये श्रीमती जावळे यांना कळविले. तसेच, विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, मुंबई या कार्यालयाचे संपूर्ण रेकॉर्ड ज्या अभिलेख कक्षामध्ये ठेवण्यात येते त्या अभिलेख कक्षात पावसामुळे झालेली गळती रोखण्याच्यादृष्टीने दुरुस्तीच्या कामामुळे रेकॉर्ड पूर्णपणे विस्कळीत झाले असल्यामुळे अपिलकाराने मागितलेल्या धारिकेचा शोध घेतला असता धारिका उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. विस्कळीत झालेले रेकॉर्ड पुन्हा पूर्वपदावर आणण्याचे काम सुरु आहे. यासंबंधीचे रेकॉर्ड उपलब्ध होताच आपणास आवश्यक असलेली माहिती यथावकाश पुरविली जाईल, असे जन माहिती अधिका-याने दि. १८.११.२००६ च्या पत्रान्वये अपिलकार श्रीमती जावळे यांना कळविले.

माहिती मिळाली नसल्याने अपिलकार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दि. ७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने दि. २९.१२.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन, अपिलकार यांनी मागणी केल्यानुसार मूळ कागदपत्रे एक महिन्याच्या आंत त्यांना देण्यांत यावी, असे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अद्याप कागदपत्र तपासणीकरिता उपलब्ध करुन दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकार, श्रीमती जावळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवचेन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्रे प्रथम अपिलीय

अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत उपलब्ध करुन दिलेली नाहीत. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत आवश्यक ती कागदपत्रे अपिलकारास जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन द्यावीत. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा.

**-आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३०४/०२**

श्री. नागेश अनिरुध्द मिश्रा, ------ **अपीलकर्ता**
२४, सहकार रोड नं.५,
शंकर रेस्टॉरंटच्या मागे, कोळ डोंगरी,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई- ४०० ०५७.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
आर्म्ड पोलीस, एल.ए. नायगांव,
पोलीस मुख्यालय, मुंबई-४०० ०१४.

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,
आर्म्ड पोलीस, एल.ए. नायगांव,
पोलीस मुख्यालय, मुंबई-४०० ०१४.
.
. **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार ॲड. (श्री.) नागेश मिश्रा यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) नायगांव, मुंबई यांच्याकडे दिनांक १४.८.२००६ रोजी अर्ज करुन निलंबित सहायक पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर कोंढाळकर यांच्याविरुध्द सुरु करण्यात आलेल्श्स विभागीय चौकशी संबंधीच्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, नायगांव, मुंबई यांच्याकडे दि. २५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि. १४.११.२००६ रोजी घेण्यात आली. प्रथम अपलिीय अधिका-यानी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दिनांक १८.६.२००८ रोजी आयोजि करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, श्री. राजेंद्र दाभाडे, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, श्री. बशीर शहानूर शेख उपस्थित होते. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही अपिलकार ॲड.( श्री.) नागेश मिश्रा हे सुनावणीसाठी हजर नव्हते.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे दिनांक १४.८.२००६ रोजी निलंबित सहायक पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर कोंढाळकर यांच्या संदर्भातील माहिती मागितली होती. केंद्रिय माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५अन्वये, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २२.१२.२००४ मधील अ क्र.७ अन्वये माहिती देता येत नाही, असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. १४.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त यांच्याकडे दि. २५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने दि. ९.११.२००६ रोजी सुनावणी घेतली. अपिलकाराने मागितलेल्या माहितीची पूर्तता करण्याच्या निर्देशासह अपील निकाली काढण्यात आले. तरीही अपिलकारास माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

श्री.नंदकिशोर गोविंद कोंढाळकर, सहायक पोलीस निरीक्षक यांना गैरवर्तणूकीच्या कारणावरुन निलंबित करण्यात येऊन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे असे दिसते. सदर विभागीय चौकशी संबंधीच्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतींची श्री.कोंढाळकर यांच्यावतीने त्यांचे वकील श्री.नागेश मिश्रा यांनी दि.१४.८.२००६ च्या अर्जान्वये मागणी केली. मागणी केलेली कागदपत्र देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप पोलीस आयुक्त,स.पो. व दं.नि.प.नायगांव यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांना आदेशित केले. त्याप्रमाणे मागितलेली माहिती तयार असून ती घेऊन जाण्याबाबत दि.११.१०.२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-याने अपिलार्थी यांना कळविले. परंतु अपिलार्थी यांनी सदरची माहिती नेलेली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, अपिलार्थी यांना जा.क्र.२२७६/सपोआ (प्रशा)/सपोवदंनिप/०८, दि.३.६.२००८ रोजी देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) सशस्त्र पोलीस दंगल नियंत्रण पथक नायगांव, मुंबई यांनी दि.१८.६.२००८ रोजी सुनावणीच्यावेळी लेखी निवेदन सादर करुन आयोगाच्या निदर्शनास आणले. अपिलार्थी सुनावणी करिता हजर नव्हते. वरील परिस्थितीत मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश -**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०१/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३०२/०२**

श्री. अर्जुन श्रीरंग तुपे, ------ **अपीलकर्ता**
१३, ज्योती सदन, गुलमोहर क्रॉस रोड नं.६,
जुहू विलेपार्ले डेव्हलपमेंट स्कीम,
जुहू, मुंबई-४०० ०४९.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक, (ई.एस.ॲन्ड पी.)
बृहमुंबई महापालिका मुख्य कार्यालय,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य अभियंता, (इमारती प्रस्ताव),
बृहमुंबई महानगरपालिका, भाभा हॉस्पिटल बिल्डिंग,
आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे(प.) मुंबई-४०० ०५०. -----**उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. अर्जुन श्रीरंग तुपे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.), मुंबई यांच्याकडे दि. १८.७.२००६ रोजी अर्ज करुन सिटी सर्व्हे नं.१८ या प्लॉटवरील एस.एस.सदन या नावाने ओळखल्या जाणा-या ज्योतीनगर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.च्या इमारतीच्या बांधकामाच्या कागदपत्रांची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने दिनांक २८.९.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यावतीने कार्यकारी अभियंता, श्री.वि.ह.पाटील, तसेच अपिलकार श्री.अर्जुन तुपे हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट

झाल्या.

अपिलकार श्री.तुपे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, वांद्रे (प.), मुंबई यांचेकडे दिनांक १८.७.२००६ रोजी अर्ज सादर करुन, सिटी सर्व्हे नं.१८, विलेपार्ले (प.) येथील एस.एस.सदन या नावाने ओळखल्या जाणा-या ज्योतीनगर को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या इमारतीच्या बांधकामासंबंधीच्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती विहित कालावधीत जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प), बृहमुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक २८.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २७.१०.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हे हजर होते.

अपिलकाराने मागणी केलेल्या इमारतीच्या कागदपत्रांची धारिका कार्यालयात उपलब्ध आहे. सदर धारिकेवरील आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात. एस.एस. सदन या इमारतीच्या मूळ धारिकेची अपिलकाराने पुन्हा एकदा पहाणी करावी. आवश्यकतेप्रमाणे शुल्क आकारुन संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती अपिलकारास उपलब्ध करुन द्याव्यात असे जन माहिती अधिका-यांना आदेशित करण्यात आले. परंतु, जन माहिती अधिका-यांनी मागणी केलेली कागदपत्रे अपिलकारास उपलब्ध करुन दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत उपलब्ध करुन दिलेली नाहीत. प्रथम अपिलीय अधिका-याने सदर प्रकरणी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३१.१०.२००६ रोजी आदेश पारित करुन अपिलकारास आवश्यक ती कागदपत्रे देण्याबाबत निदेश दिले. तरीही जन माहिती अधिका-याने अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दिसून येते. ही एक गंभीर स्वरुपाची बाब आहे. सदर परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-याने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत अपिलकारास माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी

करणे आवश्यक आहे. तेव्हा यापुढे विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिका-याने दक्षता घ्यावी अशी त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**-आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४०८/०२**

श्री. रविंद्र एल.चाळके, ------ **अपीलकर्ता**
ए/११, ३ रा मजला, रवीराज सी.एच.एस.
वीरा देसाई रोड,
अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, को.ऑप.हौसिंग सोसा.(३),
मुंबई (पश्चिम उपनगर), रुम नं. ६९, तळमजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा
उपनिबंधक, को.ऑप.हौसिंग सोसायटी,
के-पश्चिम विभाग, रुम नं.६९ ए, तळमजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री. रविंद्र चाळके यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, को.ऑप.हौसिंग सोसायटी, के-पश्चिम विभाग, रुम नं.६९ ए, तळमजला, गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि. १.४.२००६ रोजी अर्ज करुन प्लॉट नं. अे/३ वरील रवीराज को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.यांनी श्री.दिवेकर यांना सोसायटीच्या टेरेसवर कुत्र्याच्या प्रजोत्पादनासाठी परवानगी दिली. त्यासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली. जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने दि. १२.१०.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १०.११.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने दि. १५.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. के/पश्चिम विभाग, तसेच अपिलकार श्री.रविंद्र चाळके हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.रविंद्र चाळके यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे दिनांक १.४.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहितीची मागणी केली होती :-

"रविराज को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. वि.रा.देसाई रोड, अंधेरी (प.) मुंबईच्या इमारतीच्या टेरेसवर श्री. दिवेकर यांना कुत्र्याच्या प्रजोत्पादनासाठी देण्यात आलेल्या परवानगीची कागदपत्रे, यासंबंधीची २० वर्षाच्या कालावधीतील माहिती दप्तराची तपासणी करण्यास परवानगी व कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली."

रवी राज को.ऑप.हौसिंग सोसायटी या सहकारी संस्थेस शासनाकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अर्थसहाय्य मिळालेले नाही. त्यामुळे सदर संस्था माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कार्यकक्षेत येत नसल्याचे दिनांक ५.९.२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-याच्या उत्तराने समाधान झाले नसल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे दि. १२.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिनांक १९.१०.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीकरिता अपिलकार श्री.रविंद्र चाळके तसेच श्री.ए.आर.पिंगे, मुख्य लिपिक, अधिन उपनिबंधक सहकारी संस्था के/पश्चिम विभाग, मुंबई हे हजर होते.रवी राज को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.करिता शासनाद्वारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य प्राप्त झाले नसल्याने सदर संस्थेचा शासकीय प्राधिकरण यामध्ये समावेश होत नाही. जन माहिती अधिका-याने तसे अपिलकारास उत्तर दिले आहे असे आदेशात नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक १०.११.२००६ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमानुसार (DCR)सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची जागा, टेरेस, सदनिकेचा वापर व्यापारी तत्वाकरिता करता येत नाही.अशा परिस्थितीत श्री.दिवेकर यांना टेरेसवर कुत्र्याच्या प्रजोत्पादनासाठी रवी राज को.ऑप.हौसिंग सोसायटीने परवानगी कशी दिली याकरिता अपिलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित अधिका-यांकडे पत्रव्यवहार करावा.

रवी राज को.ऑप हौसिंग सोसायटीस शासनामार्फत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव अर्थसहाय्य प्राप्त झाले नसल्याची बाब लक्षात घेता सदर प्रकरण केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर हे समर्पक व नियमानुसार असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**-<u>आदेश</u> -**

**सबब अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४०७/०२**

**श्री. इनामुल्ला शेख,** **------ अपीलकर्ता**
**चिफ प्रमोटर,**
**बांद्रा राजीव नगर को.ऑप.हौसिंग सोसा.(प्रपोज्ड),**
**सी.एस.टी.एस.नं.७९१ ए (पॉईंट),**
**जैन मंदिरामागे, बझार रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अभियांत्रिकी विभाग,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५ वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री. इनामुल्ला शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि.३०.८.२००६ रोजी अर्ज करुन वांद्रे (पूर्व) सी.टी.सर्व्हे क्र.७९१-अे प्लॉटवरील नियोजित बांद्रा राजीव नगर को.ऑप.हौसिंग सोसा.ची संबंधित विकासक, वास्तुशास्त्रज्ञाच्या फाईलची तपासणी करण्याची मागणी केली होती. अपिलकाराच्या विनंतीनुसार जन माहिती अधिका-याने संबंधित फाईल तपासणीकरिता दि. २०.९.२००६ रोजी अपिलकारास पत्र देऊन परवानगी दिली. अपिलकाराने दि. २२.९.२००६ रोजी फाईलची तपासणी केली. त्यानंतर अपिलकाराने पुन्हा माहितीच्या अधिकारात त्याच दिवशी म्हणजे दि. २२.९.२००६ रोजी अर्ज करुन पहाणी केलेल्या फाईलच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-याकडे मागणी केली.

झोपडपट्टी सुधार योजनेंतर्गत सी.टी.सर्व्हे क्र.७९१-अे या प्लॉटवर नियोजित बांद्रा राजीव नगर को.ऑप.हौसिंग सोसा.च्या कामाबाबत वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स बी.आय.डी.सी.ओ. अभियंता विभाग यांनी प्रस्ताव सादर केला. परंतु, सदर प्रस्ताव अद्याप स्विकारलेला नाही. त्रयस्थ पक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलकारास

उपलब्ध करुन देण्यास त्रयस्थ पक्षाने हरकत घेतली. त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ११ (१) मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.१२.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याच्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने माहितीच्या अधिकारात प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.२८.१०.०६ रोजी प्रथम अपील दाखल केले. विभागाशी संबंधित उपलब्ध व देय माहिती विहित कालावधीत अपिलकारास देण्यात आल्याचे नमूद करुन, प्रथम अपिलीय अधिका-याने दि.१३.११.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.२७.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३०.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री.इमानुल्ला शेख हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

झोपडपट्टी सुधार योजनेंतर्गत सी.टी.सर्व्हे क्र.७९१-अे या प्लॉटवर नियोजित बांद्रा राजीव नगर को.ऑप.हौसिंग सोसा.च्या बांधकामाकरिता वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स बीआयडीसी अभियंता विभाग यांनी झोपडपट्टी सुधार प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास प्राधिकरणाने अद्याप मंजुरी दिलेली नाही. जन माहिती अधिका-याने अपिलकारास फाईलची तपासणी करण्यास परवानगी दिलेली होती. अपिलकाराने दिनांक २२.९.२००६ रोजी संबंधित फाईलची तपासणी केली. त्यानंतर तपासणी केलेल्या फाईलच्या म्हणजे त्रयस्थ पक्षाच्या कागदपत्राच्या छायाप्रतींची अपिलकाराने मागणी केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ (१) मधील तरतुदीनुसार अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्यास त्रयस्थ पक्षाने आक्षेप घेतला. त्यामुळे अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-याने दिनांक १२.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले.

झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत नियोजन बांद्रा राजीव नगर को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या बांधकामाकरिता जन माहिती अधिकारी तथा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाकडून प्रस्ताव मागविला असल्याचे दिसते. विकासक, वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स बी.डी.आय.डी.सी.अभियंता विभाग यांनी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केला. परंतु सदर प्रस्ताव प्राधिकरणाने अद्याप स्विकारलेला नाही. सी.टी.सर्व्हे क्र.७९१ अे च्या विकासाकरिता दिलेला प्रस्ताव सार्वजनिक व्यापक हिताशी संबंधित आहे. प्रस्ताव त्रयस्थ पक्षाचा असल्याचे कारणावरुन मागितलेला माहिती नाकारता येणार नाही. सद्यः परिस्थितीत वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स बी.डी.आय.डी.सी.अभियंता विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव झोपडपट्टी सुधार प्राधिकरणाने स्विकारलेला नाही. अशा परिस्थितीत अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्यात तथ्य नाही. मात्र, विकासकाचा प्रस्ताव प्राधिकरणाने स्विकारल्यास अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यांत यांवी.

**-आदेश -**

**सबब अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४११/०२**

**श्री. दामोदर नाईक,** **------ अपीलकर्ता**
**दुकान नं.३, साई आकृती सोसायटी,**
**खांबदेव नगर, धारावी,**
**मुंबई- ४०० ०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहायक संचालक, नगररचना,**
**कल्याण-डोंविली महानगरपालिका,**
**कल्याण.**

**जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,**
**कल्याण-डोंविली महानगरपालिका,**
**कल्याण.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री. दामोदर नाईक यांनी दिनांक ८.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन त्यांनी महानगरपालिकेकडे दिनांक २२.९.२००५, ७.११.२००५, २६.११.२००५, २८.११.२००५ व ५.१२.२००५ रोजी सादर केलेल्या पत्रांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी उत्तर दिले नाही. त्यामुळे अपिलार्थीने दिनांक २८.९.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १९.१०.२००६ रोजी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दि.३.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ०१.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. यु.पी.सी.ने सुनावणीची नोटीस पाठवूनही अपिलकार, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे अपिलकाराने एकूण ५ पत्रे पूर्वी सादर केली. सदर पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक

संचालक, नगररचना यांचेकडे दिनांक २८.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. तथापि, अपिलकाराच्या दि. ८.९.२००६ च्या अर्जावर ३० दिवसांचे आंत दि. ६.१०.२००६ रोजी अपिलकारास अपेक्षित माहिती पुरविली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दिनांक १९.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. परंतु अपिलातील कागदपत्रात अपिलकारास दिलेल्या माहितीची प्रत नाही. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणीकरिता बोलाविले नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दिनांक ३.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. तथापि, दिनांक ६.१०.२००६ च्या पत्राने ३० दिवसांच्या आत माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक १९.१०.२००६ च्या पत्रात नमूद केले असले तरी अपिलकारास मागणीप्रमाणे आवश्यक माहिती मिळाली नसल्याचे दिसते. या परिस्थितीत मी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

**-आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४१३/०२**

**श्री. भगत रामचरित्र सिंग,** **------ अपीलकर्ता**
**१४, गायत्रीकृपा, पोलीस स्टेशन समोर,**
**नेताजी सुभाषचंद्र बोस, रोड,**
**मुलुंड (प.), मुंबई- ४०० ०८०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (कल्याण ग्रामीण),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, ४था मजला,**
**ए विंग, जहागीर मैदानाजवळ, कर्णिक मार्ग,**
**कल्याण (प.) ४२१ ३०१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार,**
**उप कार्यकारी अभियंता (कल्याण ग्रामीण),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, ४था मजला,**
**ए विंग, जहागीर मैदानाजवळ, कर्णिक मार्ग,**
**कल्याण (प.) ४२१ ३०१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री. भगत रामचरित्र सिंग यांनी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, कल्याण ग्रामीण विभाग, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय यांचेकडे दिनांक ५.१०.२००६ रोजी अर्ज करुन विजेचे अधिक रकमेचे बिल, खराब मीटर बदलून देणे इ.अनुषंगिक बाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कल्याण ग्रामीण विभाग, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने दिनांक २१.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ०१.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार श्री. भगत रा.सिंग हे हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या

अपिलकार श्री.भगत रामचरित्र सिंग यांनी माहितीच्या अध्यिाकारात जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) वीज आकार देयक दिनांक ३०.६.२००६ हे अधिक आकार लावलेले असल्याने सुधारित करुन देणे.

(२) वीज मीटर क्र.७०००१८१८३४ हे बिघडले असल्याने दुरुस्त करणे.

(३) वीज देयक श्री.भगत रामचंद्रसिंग अशा चुकीच्या नावाने न देता श्री.भगत रामचरित्र सिंग अशी दुरुस्ती करणे.

वर नमूद तीन मागणींकरिता अपिलकाराने दिनांक २२.८.२००६, ४.९.२००६ व २२.९.२००६ रोजी जन माहिती अधिका-याकडे पत्र पाठविली होती. सदर पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत अपिलकाराने मागणी केली. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मागणीप्रमाणे माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता हे दिनांक ०३.०७.२००८ रोजी आयोगात आले होते. सुनावणीची नोटीस त्यांना टपालातून उशिरा मिळाल्याने सुनावणीकरिता उपस्थित रहाता आले नसल्याचे त्यांनी सांगितले. अपिलकाराच्या मागणीनुसार दि. ३०.६.२००६ चे वीज देयक सुधारित करुन दिले असल्याचे, तसेच बिघडलेले वीज मीटर बदलून दिले, अपिलकाराचे नांवही श्री.भगत रामचरित्र सिंग असे सुधारित करुन दिले असल्याने त्यांनी प्रत्यक्ष भेटीच्यावेळी वीज बिलाची झेरॉक्स प्रत दाखवून सांगितले. यावरुन अपिलकाराच्या मागणीनुसार आवश्यक कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश -**

**सबब अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४१५/०२**

**श्रीमती रुपाली बाळकृष्ण काणेकर, ------ अपीलकर्ता**
**१०१, अनुभूती को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**राधाबाई म्हात्रे रोड,**
**दहिसर (प.), मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अपंग कल्याण आयुक्तालय,**
**३ चर्च रोड, पुणे.**

**जन माहिती अधिकारी**
**अपंग कल्याण आयुक्तालय,**
**३ चर्च रोड, पुणे. -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्रीमती रुपाली बाळकृष्ण काणेकर यांनी जन माहिती अधिकारी, आयुक्त अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दिनांक १२.९.२००६ रोजी अर्ज सादर करुन अंशदायी भविष्य निर्वाह निधीची देय रक्कम देण्यास होणा-या विलंबाची कारणे व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी, आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिका-यांच्यावतीने लेखाधिकारी,जिल्हा पुनर्वसन केंद्र,विरार हे हजर होते. सुनावणीकरिता दिनांक २०.६.२००८ रोजी यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनही अपिलकार श्रीमती रुपाली काणेकर हजर नव्हत्या.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील विरार येथील जिल्हा पुनर्वसन केंद्रात अपिलकार श्रीमती रुपाली काणेकर या Occupational Therapist म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी सदर पदाचा दिनांक १.७.२००५ रोजी राजीनामा दिला असून, त्यांना दिनांक ३१.७.२००५ पासून कार्यमुक्त करण्यांत आले.

अपिलकारास देय अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम प्राप्त झाली नसल्याने त्यांनी जन माहिती अधिका-याकडे पुढील दोन मुद्दयांबाबत माहिती मागितली.

(१) अपिलकारास देय अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम देण्यास होणा-या विलंबाची कारणे.

(२) अंशदायी भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीपोटी अपिलकाराच्या वेतनातून वसूल करण्यात आलेली वर्गणी तसेच त्यासाठी कार्यालयाने जमा केलेली वर्गणीची रक्कम याबाबतची दिनांक ०१ जून,१९९८ ते ३१.७.२००५ पर्यंची माहितीची मागणी केली.

जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. मागितलेली माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि. १५ जानेवारी,२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्रीमती रुपाली काणेकर या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, अपंग कल्याण कार्यालयाशी संबंधित विरार येथील जिल्हा पुनर्वसन केंद्रात Occupational Therapist या पदावर कार्यरत होत्या. त्यांनी सदर पदाचा राजीनामा दिला असून, त्यांना दि. ३१.७.२००५ रोजी कार्यमुक्त केले. त्यांना अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम प्राप्त झाली नसल्याने त्यांनी याबाबत जन माहिती अधिका-यांकडे माहिती मागितली. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही हे निश्चितच योग्य नसून गंभीर स्वरुपाची बाब आहे. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ची काटेकोरपणे अंमलबजावणी करावयाची आहे. तरी मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत द्यावी. भविष्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी करण्यास कसूर केली जाणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**-आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई /दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४१९/०२**

**श्री.संजय भालचंद्र मेस्त्री, ------ अपीलकर्ता**
**द्वारा-श्रीमती शैला भालचंद्र मेस्त्री,**
**४, तळमजला, मानस दत्ताराम लाड मार्ग,**
**काळाचौकी, मुंबई- ४०० ०३३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (पुगा),**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अन्वेषण अधिकारी,**
**दक्षता विभाग प्राधिकरण,**
**रुम नं. ३६६,२ रा मजला, म्हाडा,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्रचना मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री.संजय भालचंद्र मेस्त्री यांनी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी (पुगा), मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचेकडे दि. २२.११.२००६ रोजी अर्ज करुन, २ मानस दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई येथील सदनिका अवैध रित्या मंडळ अधिका-याच्या मदतीने हस्तांतरित केल्या. याबाबत दक्षता पथकाने चौकशी केलेल्या अहवालाच्या प्रतींची व इतर २ ते ८ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. ५.१.२००७ रोजी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि. २२.१२.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशानुसार माहिती मिळाली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.३.२००७ रोजी द्वितीय अपील

दाखल केले. सदर अपिलावर दि. १ जुलै,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने दि. २०.६.२००८ रोजी पत्र पाठवूनही अपिलकार, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.संजय मेस्त्री यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी (पुगा) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचेकडे दि.२२.११.२००६ रोजी अर्ज करुन २ मानस दत्ताराम लाड मार्ग काळाचौकी, मुंबई येथील सदनिका अवैधरित्या मंडळाच्या अधिका-यांच्या मदतीने हस्तांतरित केल्या. या प्रकरणी दक्षता पथकाने केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रतींची तसेच अन्य २ ते ८ अशा ७ मुद्दयांबाबत माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास पुढीलप्रमाणे माहिती दिली.

(१) दक्षता अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाला नाही असे प्राप्त कागदपत्रांवरुन दिसून येते. (२) तपासणी अहवाल क्र. ३०५, दि. ६.९.२००३ अनुसार शैलेंद्र पवार रहात असल्याचे दिसून येते. (सोबत अहवाल जोडला). (३) शिल्पा मेरवेकर यांचे नांवे गाळा नियमित करण्यांत आला आहे. (४) मानवी हक्क आयोगास अहवाल सादर करण्यात आला. (५) स्टैटस को असल्याचे ज्ञात. परंतु रत्नाकर आंबेकर यांची काही माहिती नाही. (६) सद्याची भाडेपावती शिल्पा संजय मेरवेकर यांचे नांवे आहे. (८) शिल्पा मेरवेकर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या.

जन माहिती अधिका-याने मागितलेली माहिती दिली नाही यामुळे अपिलकाराने दिनांक २२.१२.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने दि. १७.१.२००७ रोजी सुनावणी घेतली. अपिलकारास सात दिवसात माहिती देण्याबाबत दि. २३.२.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर प्रकरणी चौकशी पूर्ण होताच त्याबाबतचा अहवाल अवगत करण्यात येईल. अर्जातील क्र.२ ते ८ मुद्दयांबाबतची माहिती उप मुख्य अधिकारी/पुनर्रचित गाळे कार्यालयाशी संबंधित असल्याने त्याबाबत त्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिनांक ६.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही, चुकीची माहिती पुरविली. जाणूनबुजून माहिती पुरविण्यास उशीर केला. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार अद्याप माहिती पुरविली नाही. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवचेन लक्षात घेता असे दिसून येते की, २ मानस दत्ताराम लाड मार्ग काळाचौकी, मुंबई येथील गाळे अवैधरित्या हस्तांतरित केल्याप्रकरणी दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यात येत आहे. सदर चौकशी अहवालाची प्रत तसेच अनुषंगिक बाबींची माहिती अपिलकारास चौकशी पूर्ण झाली नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-याने दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, या प्रकरणी चौकशी पूर्ण झाली नसल्यास

चौकशी पूर्ण झाल्याबरोबर आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-याने अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास अवलोकनार्थ सादर करावा.

**-आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/०७/२००८.**

]

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४३९/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रिया,** **------ अपीलकर्ता**
**बेले विस्ता, फ्लॅट नं.१३, ३ रा मजला,**
**तलाव व एल.आय.सी.कार्यालयासमोर,**
**एस व्ही.रोड, वांद्रे(प.),मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी महापालिका मार्केट,**
**एम.आर.ए. मार्ग, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) यांचे कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी महापालिका मार्केट,**
**एम.आर.ए. मार्ग, मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री.अर्जुनलाल छाब्रिया यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इस्टेट), सहाय्यक आयुक्त (इस्टेट) यांचे कार्यालय, छत्रपती शिवाजी महापालिका मार्केट, मुंबई यांच्याकडे दिनांक निरंक अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.६४, २३ भाग-१ (पीटी) बांदीवली गांव, जोगेश्वरी येथील देतीनर्स कंपाऊंड या नांवाने ओळखल्या जाणा-या प्लॉटच्या लिज डीड (lease deed) च्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (इस्टेट), छत्रपती शिवाजी महापालिका मार्केट, मुंबई यांच्याकडे दिनांक १८.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय अधिका-यांनी दि. ९.१.२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ३ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री.व्ही.ए.कांबळे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (इस्टेट), श्री.बाबासाहेब पवार हजर होते. सुनावणीसाठी यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही अपिलकार श्री. अर्जुनलाल छाब्रिया हजर नव्हते.

जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अर्जुनलाल छाब्रिया यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.६४, २३ भाग-१, पी.टी.बांदिवली गाव, जोगेश्वरी येथील देतीनर्स कंपाऊंड नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉटची लीज डीडच्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. याबाबत जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत उत्तर दिले नाही. त्यामुळे अपिलकाराने दि.१८.१२.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (इस्टेट) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही. सीटी सर्व्हे क्र.६४ चा प्लॉट सहायक आयुक्त कार्यालयाने वाटप केलेला नाही. तसेच याबातची कागदपत्र, प्लॅान्स कार्यालयात उपलब्ध नाहीत. यामुळे सहायक आयुक्त कार्यालय कोणतीही माहिती देऊ शकत नाही. अपिलकाराने मागितलेली माहिती सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग, महापालिका कार्यालय इमारत, पालीराम रोड, अंधेरी (प.) मुंबई यांचे कार्यकक्षेतील असून, त्या कार्यालयाकडे संपर्क साधावा असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास पूर्वीच दि. १३.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले होते. अपिलकाराचे प्रथम अपिलही पुढील आवश्यक कार्यववासाठी त्या कार्यालयाकडे पाठविले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधित नव्हती. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलकाराचा दि. १८.१२.२००६ चा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता संबंधित अधिकारी, सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग, यांचेकडे पाठवून तसे अपिलकारास कळविले. परंतु, अपिलकाराने मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग, महापालिका कार्यालय इमारत, पालीराम रोड, अंधेरी (प.) मुंबई यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे हे समजून येत नाही. कारण अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. तेव्हा अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध करुन दिली असल्यास तसे आयोगास कळवावे.

**-आदेश -**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई/दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३३२/०२**

**श्रीमती संजीवनी रमेश पवार,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-श्री.डी.टी.पानसे,**
**ए-४४, पाल्म एकर्स को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**महात्मा फुले रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**चिफ पर्सनल ऑफीसर,**
**बेस्ट यु/टी, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**बेस्ट यु/टी, इलेक्ट्रीक हाऊस,**
**कुलाबा, मुंबई- ४०० ००१.** **-----उत्तरवादी**

**- <u>वि वे च न-</u>**

अपिलकार श्रीमती संजीवनी रमेश पवार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अनुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (p.o.) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे दि. ७.११.२००५ रोजी अर्ज करुन सन १९९८ पासून त्यांना घरभाडे भत्ता का दिला नाही याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी (c.p.o.) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १९.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी श्री.स.ना.नारायणकर तसेचअपलिकार श्रीमती संजीवनी पवार हया हजर होत्या.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती संजीवनी रमेश पवार हया बुृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम येथे लिपिक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन त्यांना सन १९९८ पासून घरभाडे भत्ता देण्याबाबत मागणी केली होती. उपक्रमाच्या नियमानुसार बेस्ट उपक्रमात कार्यरत असलेल्या व उपक्रमाच्या निवासस्थानात रहात असलेल्या पती-पत्नी दोघांनाही घर भाडे भत्ता अनुज्ञेय नाही असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.

सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. त्यामध्ये बेस्ट उपक्रमाच्या एस.आर. ८.२.१ (a) अनुसार उपक्रमाच्या निवासस्थानात रहाणा-या पती-पत्नी उभयतांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही असे जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले. सदर जन माहिती अधिका-याची भूमिका प्रथम अपिलीय अधिका-यांनी मान्य केली. तसेच उपक्रमाच्या निवासस्थानात रहाणारे पती-पत्नी कायद्याने वेगळे झाले असल्यास, घटस्फोट झाला असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करण्याबाबत जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले असल्याची बाब नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्रीमती संजीवनी रमेश पवार व त्यांचे पती श्री.रमेश पवार हे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम सेवेत कार्यरत आहेत. तसेच त्यांना उपक्रमाच्या निवासस्थानाचे वाटप करण्यात आले. उपक्रमाच्या ज्या कर्मचा-यांना निवासस्थानाचे वाटप करण्यात आले आहे अशा कर्मचा-यांना उपक्रमाच्या नियमानुसार घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. तथापि, पती पत्नी कायदेशीररित्या विभक्त झाले असल्याचा कागदोपत्री पुरावा, घटस्फोटाची डिक्री सादर केल्याशिवाय अपिलकारास घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही असे जन माहिती अधिका-याने दिनांक ५.११.२००४ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर हे समर्पक असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**- आदेश -**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३३३/०२**

**श्रीमती संजीवनी रमेश पवार,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा-श्री.डी.टी.पानसे,**
**ए-४४, पाल्म एकर्स को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**महात्मा फुले रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**चिफ पर्सनल ऑफीसर,**
**बेस्ट यु/टी, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**बेस्ट यु/टी, इलेक्ट्रीक हाऊस,**
**कुलाबा, मुंबई- ४०० ००१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती संजीवनी रमेश पवार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अनुसार जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (p.o.) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे अर्ज करुन त्यांनी श्रेणी- अ/जी-७ मधील पर्यवेक्षीय (p) पदावर पदोन्नती देण्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत, माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १९.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी श्री.स.ना.नारायणकर तसेच अपिलकार श्रीमती संजीवनी पवार हे हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने ग्रेड-अे/जी-७ मधील पर्यवेक्षीय (p) पदावर पदोन्नती मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे अर्ज करुन एकूण ७ मुद्दयांबाबत

माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने मागितलेली माहिती ही सेवाविषयक असल्यामुळे नाकारली. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन दि.२१.२.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती अपिलकारास कळविण्यात आली. त्यानुसार पर्यवेक्षीय पदावरील पदोन्नतीकरिता अपिलकाराची निवड करण्यात आली आहे. परंतु, अपिलकार वारंवार गैरहजर रहात असल्यामुळे त्यांना पर्यवेक्षीय पदावर एक वर्षाच्या कालावधीनंतर पदोन्नती देण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानंतर अपिलकाराची उपस्थिती, वर्तणूक, कामामध्ये समाधानकारक सुधारणा झाली नसल्याने पुन्हा त्यांची पदोन्नती एक वर्षाने पुढे ढकलण्यात आली. भविष्यात त्यांच्या कामामध्ये, उपस्थितीमध्ये सुधारणा झाली नाही तर पर्यवेक्षीय पदाकरिता तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमधून त्यांचे नांव वगळण्यात येईल असे अपिलकारास कळविण्यात आले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन व सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेले प्रतिपादन लक्षात घेता कार्यालयातील सततच्या अपिलकाराच्या गैरहजेरीमुळे उपक्रमाच्या कामावर विपरित परिणाम होत असल्याच्या कारणा वरुन अपिलकारास त्यांच्या वर्तणूकीमध्ये सुधारणा करणेबाबत वेळोवेळी त्यांना ज्ञापन देण्यात आले. तरीही त्यांच्या वर्तणूकीत समाधानकारपणे सुधारणा झाल्याचे आढळून आले नसल्यामुळे त्यांची पर्यवेक्षीय पदावरील पदोन्नती पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर योग्य वाटते. अपिलकाराचे सदरील प्रकरण सेवाविषयक बाबीशी संबंधित आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**-आदेश -**

**सबब, अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/३३१/०२**

**श्री. महेंद्र जनार्दन चव्हाण, ------ अपीलकर्ता**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल रोड, सायन,**
**चुनाभट्टी, मुंबई-४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा (सिडको),**
**शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्या.**
**सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,**
**नवी मुंबई- ४०० ६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा(सिडको),**
**शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्या.**
**सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,**
**नवी मुंबई- ४०० ६१४. -----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्री.महेंद्र जनार्दन चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अनुसार जन माहिती अधिकारी, सिडको भवन, सीबीडी बेलापूर यांचेकडे दिनांक ७.१०.२००६ रोजी अर्ज करुन सिडको मधील गट क व गट ड च्या सेवाभर्तीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सिडको भवन, सीबीडी बेलापूर यांचेकडे दिनांक २८.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ४.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १९.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने दिनांक ७.६.२००८ रोजी नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हतृे अपिलकार श्री.महेंद्र जनार्दन चव्हाण हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.महेंद्र ज.चव्हाण यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन सिडको मध्ये गट क व गट ड पदांवरील सेवाभर्तीबाबत माहिती मागितली होती. सेवाभर्तीसाठी दिलेल्याउ जाहिरातीच्या प्रती, अनुषंगिक सेवाभर्ती कागदपत्रांच्या प्रती, सेवाभर्ती करणारे सर्व संबंधित अधिका-यांची नावासंबंधीची माहिती मागितली होती. अपिलकाराने माहिती अर्जात सर्वोच्च न्यायालयाच्या अपील क्र. ११६४६-११७२४/१९९६ तसेच गृह मंत्रालयाच्या दिनांक २७.११.१९७१ च्या पत्राचा उल्लेख केला होता. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश तसेच गृह मंत्रालयाच्या पत्राची प्रत सिडको कार्यालयात उपलब्ध नाहीत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत तसेच गृह मंत्रालयाच्या दिनांक २७.११.१९७१ च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन द्यावी. त्याशिवाय मागितलेली माहिती देण्याची कार्यवाही करता येत नसल्याचे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि. १९.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. अपिलकाराचे जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने समाधान झाले नसल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी, सिडको यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ४.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सदर विवेचन लक्षात घेता सरळ सेवाभर्ती करताना अधिक खपाच्या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, त्यास व्यापक प्रसिध्दी देऊन, अर्ज मागवून सरळ सेवाभर्ती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यानुसार सिडको मधील गट क व गट ड पदाची सेवाभर्ती झाली किंवा कसे याबाबत अपिलकारास अवगत करुन घेण्यासाठी सेवाभर्तीबाबतची अपिलकाराने माहिती मागितली असल्याचे दिते. तरी अपिलकाराच्या मागणीनुसार सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४४०/०२**

**श्री. हरिश चंदर,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.१ /५ /टी /ई,**
**सी.जी.एस. कॉलनी,,**
**घाटकोपर (प.),मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका आयुक्त,**
**मीरा-भाईंदर महानगरपालिका,**
**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), जिल्हा-ठाणे-४०१ १०१.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**सहाय्यक नगररचनाकार (नगर रचना विभाग),**
**मीरा-भाईंदर महानगरपालिका,**
**मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), जिल्हा-ठाणे-४०१ १०१.**

**-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री.हरिश चंदर यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार, नगररचना विभाग, मीरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर यांचेकडे दि. १२.३.२००६ रोजी अर्ज करुन मारीगोल्ड को.ऑप.हौसिंग सोसायटी मिरा रोड (पूर्व) मधील फ्लॅट क्र.६०३, विंग-२६ चे भोगवटा प्रमाणपत्र व अनुषंगिक बाबींची मागणी केली. जन माहिती अधिका-याने दि. १३.१०.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने पुन्हा दि.२९.१०.२००६ रोजी अर्ज सादर केला. अपिलकारास मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याने दि. १४.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री.हरिश चंदर हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.हरिश चंदर यांनी माहितीच्या अधिकारात दि. १२.३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार, नगररचना विभाग, मीरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे अर्ज सादर करुन मारीगोल्ड को.ऑप.हौसिंग सोसायटी मिरा रोड (पूर्व) मधील फ्लॅट क्र.६०३, विंग-२ इ ची सद्य:स्थिती व त्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. जन माहिती अधिका-याने दि.१३.१०.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. त्यामध्ये इमारत क्र.२ मध्ये विंग अे, बी, सी या तीन इमारतींसाठी भाग भोगवटा दाखला देण्यात आला असल्याचे अपिलकारास कळविले.

अपिलकाराने पुन्हा माहितीच्या अधिकारात दि.२९.१०.२००६ रोजी जन माहिती अधिका-याकडे अर्ज सादर करुन फ्लॅट क्र.६०३, विंग-२ इ चा भोगवटा दाखला, भोगवटा दाखला देण्यासाठी होणा-या विलंबाची कारणे, प्रॉपर्टी टॅक्सबाबतचे स्पष्टीकरण, सदर सोसायटी विरुध्द करण्यात आलेली कारवाई इ.माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. या परिस्थितीत अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले किंवा कसे, प्रथम अपिलीय अधिका-याने काय आदेश पारित केले याबाबतच्या प्रती अपिलातील कागदपत्रासोबत नसल्याने खुलासा होत नाही. अपिलकाराने थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकारास मारीगोल्ड को.ऑप.हौसिंग सोसायटी मिरा रोड (पूर्व) मधील फ्लॅट क्र.६०३, विंग-२ इ चे भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही. अपिलकारास भोगवटा प्रमाणपत्र अद्याप का देण्यात आलेले नाही याबाबत आयुक्त, महानगरपालिका, मिरा भाईंदर यांनी सविस्तर खुलासा अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत कळवावा. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

**-आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४०६/०२**

**श्री. जोसेफ आय. जोगदंड,** **------ अपीलकर्ता**
**इमारत क.७६-ए/६०२, टिळक नगर,**
**शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**टिळक नगर क्र.१, चेंबूर, मुंबई- ४०० ०८९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सहमुख्य अधिकारी, सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री.जोसेफ आय. जोगदंड यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन. वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. १०.६.२००६ रोजी अर्ज करुन टिळक नगर, शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.च्या कामकाजाबाबत माहिती मागविली होती. जन माहिती अधिका-याने /प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३ मे, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ३० जून,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, म्हाडा, डॉ.किशोर मांडे तसेच अपिलकार श्री.जे.आय.जोगदंड हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.जे.आय.जोगदंड यांनी माहितीच्या अधिकारात दि. १९.६.२००६ रोजी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

टिळक नगर शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. इ.क्र.७६ शेल कॉलनी, सहकार नगर क्र.१ चेंबूर, मुंबई या संस्थेचे पदाधिकारी आणि इस्टेट एजंट श्री.चिंतामण प्रल्हाद कोल्हेकर यांनी सोसायटीतील श्रमजिवी माणसावर दडपण आणून काही रक्कम देवून बेकायदा त्यांची घरे ताब्यात घेतली. इमारत पुनर्बांधणीचा बनावट करारनामा केला. सोसायटीच्या जमिनीचा अवैध ताबा घेऊन त्यावर बेकायदा इमारत बांधकाम केले.

जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांचेकडे दिनांक ३.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहमुख्य अधिकारी तथा अपिल अधिकारी यांनी दि.८.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु, कायद्यातील तरतुदीनुसार प्रथम अपिलीय अधिका-याने रितसर सुनावणी घेतली नाही. कारण प्रथम अपिलीय अधिका-यांच्या कनिष्ठ अधिका-यांनी सुनावणीची कार्यवाही पूर्ण केली, तसेच टिळक नगर शिवम को.ऑप.हौसिंग सोसायटी या संस्थेच्या व्यवस्थापक समितीने सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय बिल्डरचा प्रस्ताव मान्य केला अशी अपिलकाराची तक्रार आहे. अपिलकाराच्या घरावे कुलूप तोडले, घरातील सामान बेपत्ता केले, टेलिफोन केबल कापली, विजेची वायर तोडली, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन काढून टाकली, घर सोडून जाण्यास भाग पाडले. अपिलकाराचे वय ७३ वर्षे असून ते ज्येष्ठ नागरिक आहेत. अपिलकाराने मांडलेली ही व्यथा लक्षात घेता टिळक नगर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.इमारत क्र.७६ च्या पुनर्बांधणीबाबत अपिलकाराने मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे पाठवावा.

**-आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२८७/०२**

**श्री. गणेश विठ्ठल नखाते,** **------ अपीलकर्ता**
**२०९/ ४. ५. ६ हिराबाई चाळ,**
**गणेशबाग लेन, कुर्ला स्टेशनच्या मागे,**
**कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(जल कामे),**
**एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री. गणेश विठ्ठल नखाते यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (जल कामे), एल विभाग, कुर्ला, यांच्याकडे दि.२२.८.२००६ रोजी अर्ज करुन विभाग क्रमांक १६५ मधील सार्वजनिक नळाच्या जागेसंबंधी माहिती मागितली. जन माहिती अधिका-याने दि.१२.१०.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल विभाग, कुर्ला, मुंबई यांच्याकडे दि.४.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, (जल कामे), श्री.वि.द.पवार, स.ना.सोनावणे, सहायक अभियंता, तसेच अपिलकार श्री.गणेश नखाते हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.गणेश वि.नखाते यांनी दिनांक २२.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एल विभाग, कुर्ला यांच्याकडे अर्ज करुन विभाग क्र.१६५ मधील सार्वजनिक नळांची संख्या किती, सार्वजनिक नळामध्ये कोठल्या गुंडांनी अतिक्रमण केले, सार्वजनिक नळाची जागा पाच वर्षापूर्वी किती चौ.फूट होती, त्यात किती नळ होते, सध्या किती चौ.फूटामध्ये किती नळ आहेत, बृहन्मुंबई महानगरपालिका नळांची जागा विकते काय, विकत असल्यास कोणत्या पेपरात जाहिरात दिली, वॉर्ड क्र.१६५ मधील गरिबांचे उच्चाटन झाले काय, किंवा बृहन्मुंबई महानगरपालिका ती जागा नका

म्हणून कोठल्या संस्थेला रितसर दिली असल्यास त्याचा तपशील इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे मुद्देनिहाय उत्तर अपिलकारास दिनांक १२.१०.२००६ च्या पत्रान्वये दिले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एल.विभाग, कुर्ला यांच्याकडे दि. ४.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १९.१२.२००६ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार श्री. नखाते हजर होते. अपिलकाराने मागितलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-याने अपिलकारास उपलब्ध करुन दिली आहे. जी माहिती सहायक अभियंता, एल.विभाग यांच्याकडे उपलब्ध नाही त्याबाबत त्यांनी अपिलकारास दिलेले उत्तर बरोबर असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित करुन अपील निकालात काढले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता, अपिलकाराने दिनांक १२.८.२००६ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (जल कामे), एल विभाग, कुर्ला यांनी अपिलकारास मुद्देनिहाय उत्तर दिले. तसेच अर्जातील इतर मुद्दयांबाबत सहायक अभियंता (परिरक्षण), एल विभाग, कुर्ला यांनी दि.६.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास उत्तर दिले. सार्वजनिक नळाच्या जागेत समाजमंदिर बांधले असल्याचे जन माहिती अधिकारी तथर सहायक अभियंता, एल. विभाग यांनी सुनावणीच्यावेळी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. **विभाग क्र.१६५मधील सार्वजनिक नळाच्या जागेत डॉ.श्री.महेश माधवराव पेडणेकर यांनी मंडळाच्या नावावर स्वतःचे कार्यालय बांधले. सार्वजनिक नळाची जागा हडप केली. त्यावर पुन्हा सार्वजनिक नळ बसवावेत. याबाबत जन माहिती अधिका-याने अपुरी माहिती दिली असल्याचे अपिलकाराने दि.१२.३.२००७ च्या द्वितीय अपिलातच नमूद केले आहे**. यावरुन सार्वजनिक नळाची जागा अवैधरित्या वापरण्यात येत असल्याची अपिलकाराची धारणा असल्याचे दिसते. याकरिता अपिलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दाद मागणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**-<u>आदेश</u> -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२०३३/०२**

**श्री. दिपक कदम** **----- अपिलकार**
**सचिदानंद को.ऑप.हौ.सोसायटी,**
**खोली नं.५१, काळेवाडी,जी.डी.आंबेडकर मार्ग,**
**परेल टँक रोड, मुंबई- ४०० ०३३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,**
**मुंबई शहर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,**
**मुंबई शहर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१) अन्वये अपिलकार श्री.दिपक कदम यांनी जन माहिती अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर, मुंबई यांचेकडे दि.४.१.२००६ रोजी अर्ज करुन प्रपत्र-क्ष-५२ मध्ये नियुक्ती अधिका-यांना पाठविलेल्या उमेदवारांच्या यादीची प्रत, राष्ट्रीय स्वयंरोजगार सेवा मॅन्युअल-१ आणि २ प्रमाणे असलेल्या कागदपत्रांच्या प्रती, केंद्र तसेच राज्य शासनाच्या नियुक्ती अधिका-यांनी पद भरतीकरिता दिलेल्या जाहिरातीच्या प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने दिनांक २१.१२.२००५ व दि. १.२.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.२.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील माहिती अधिकारी श्री.सं.न.म्हस्के यांनी विहित कालावधीत उत्तर दिले असल्याचे नमूद करुन अर्ज दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांनी अपिलकारास कळविले. यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, श्री.श.बा.खैरे, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सं.न.म्हस्के तसेच अपिलकार श्री.दिपक कदम हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. दिपक कदम यांनी दिनांक ४.१.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील प्रपत्र-क्ष-५२ मध्ये नियुक्ती प्राधिका-यांना पाठविलेल्या उमेदवारांच्या यादीची प्रत व इतर अनुषंगिक बाबींची माहिती मागितली होती. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. सं.न.म्हस्के यांनी अपिलकारास दि. २१.१२.२००५ व दि.१.२.२००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. त्यामध्ये अपिलकाराच्या अर्जातील रकाना क्र.अे, बी, सी, डी -१, २ बाबत माहिती उपलब्ध नसल्याचे व प्रपत्र -क्ष-५२ चा वापर करण्यात येत नसल्याचे अपिलकारास कळविले. त्यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन माहिती अधिकारी श्री.सं.न.म्हस्के यांनी अपिलकारास मुद्देनिहाय उत्तर दिले असल्याचे नमूद करुन अपील दफ्तरी दाखल करण्यात येत असल्याचे अपिलकारास कळविले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.७.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, सेवायोजन कार्यालयातील रोजगार नियमावलीनुसार रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयातील कागदपत्र पाच वर्षांपर्यंत जतन करुन ठेवण्यात येतात. अपिलकाराने दिनांक १.१.१९८७ ते १.१.२००० या कालावधीतील कागदपत्रांची दिनांक ४.१.२००६ च्यचा अर्जान्वये मागणी केली. यावरुन पाच वर्षापूर्वीच्या कागदपत्रांची अपिलकाराने मागणी केलेली असल्यामुळे सदर कागदपत्र नियमानुसार पाच वर्षांनंतर नष्ट केली असल्यामुळे अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याचे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. एकाच प्रकारची माहिती वारंवार अर्ज करुन अपिलकार मागणी करतात असे दिसते. याच विषयावर राज्य माहिती आयोगाकडे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे दोन वेळा सुनावणी आयोजित होऊन दिनांक २२ मार्च, २००६ व दिनांक २० एप्रिल,२००६ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळण्यात आले आहे.

या परिस्थितीत मी पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**-<u>आदेश</u> -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबइ**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४९८/०२**

**श्रीमती किरण अरुण राणे,** **------ अपीलकर्ता**
**मीनाताई वेल्फेअर सोसायटी,**
**रुम नं.२१८, जुनी हनुमाननगर,**
**गोरेगांव (पश्चिम), मुंबई-४०० ०९०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती किरण अरुण राणे, यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्रीमती किरण अरुण राणे, अंगणवाडी सेविका हया हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिंना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४९९/०२**

**सौ. मधुरा चंद्रकांत परब,** **------ अपीलकर्ता**
**१०७/श्री स्वामी साई कृपा को.ऑप.हौ.सोसा.**
**नटवरनगर, रोड नं.५,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती मधुरा चंद्रकांत परब यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, तसेचअपिलकार श्रीमती मधुरा चंद्रकांत परब, अंगणवाडी सेविका हया हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५००/०२**

**श्रीमती अनिता प्रकाश वाघ,** **------ अपीलकर्ता**
**२८७/२२९९, मोतीलाल नगर-२.**
**एम.जी.रोड, दत्तमंदिरसमोर,**
**गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती अनिता प्रकाश वाघ यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, तसेचअपिलकार श्रीमती अनिता प्रकाश वाघ, अंगणवाडी सेविका हया हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५०१/०२**

**श्रीमती शालिनी नामदेव नंदनवार,** **------ अपीलकर्ता**
**पंचम सोसायटी. म्हाडा वनराई कॉलनी,**
**निलॉन कंपनीसमोर,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०० ०६३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती शालिनी नामदेव नंदनवार यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भव-न, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, तसेचअपिलकार श्रीमती शालिनी नामदेव नंदनवार, अंगणवाडी सेविका हया हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्व्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५०५/०२**

**श्रीमती स्मिता शशिकांत राणे,** **------ अपीलकर्ता**
**आम्रपाली को.ऑप.हौ.सोसायटी,**
**रुम नं.७, गायकवाड नं.८, मालवणी,**
**मालाड (पश्चिम), मुंबई-४०० ०९५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती स्मिता शशिकांत राणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, तसेचअपिलकार श्रीमती स्मिता शशिकांत राणे, अंगणवाडी सेविका हया हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५०६/०२**

**श्रीमती हर्षला हेमचंद पाटील,** **------ अपीलकर्ता**
**सिताराम सिंग चाळ, सिध्दीविनायक मंदिर,**
**मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती हर्षला हेमचंद पाटील, यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, हजर होते. अपिलकार श्रीमती हर्षला हेमचंद पाटील यांना यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनही त्या सुनावणीकरिता हजर नव्हत्या.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की,

अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५१०/०२**

**श्रीमती रत्नमाला अनंत बराथे,** **------ अपीलकर्ता**
**सिताराम सिंग चाळ, सिध्दीविनायक मंदिर,**
**मजासवाडी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ००६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती रत्नमाला अनंत बरार्थ, यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री. टी.आर.दराडे, एकात्मिक बालविकास सेवा योजना, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त श्री. बी.टी. पोखरकर, तसेच अपिलकार श्रीमती रत्नमाला अनंत बराथे हे सुनावणीकरिता हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी

परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही.  वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/५२३/०२**

**श्रीमती लतिका जगन्नाथ जाधव,** **------ अपीलकर्ता**
**शुभकामना को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**सेक्टर नं.५, प्लॉट नं.५१३, डी-७,**
**चारकोप, कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन, पहिला मजला, नवी मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**रायगड भवन,पहिला मजला, नवी मुंबई.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न-**

अपिलकार श्रीमती लतिका जगन्नाथ जाधव, यांनी जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (बालवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे अर्ज करुन शहरी प्रकल्पातील अंगणवाडी सेविकामधून मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना रायगड भवन, नवी मुंबई यांच्याकडे ३० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतर प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही, आदेश पारित केले नाहीत. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १६ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, तसेच अपिलकार श्रीमती लतिका जगन्नाथ जाधव हे सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतर्फे दिनांक ८.१०.२००६ रोजी अंगणवाडी सेविकेतून मुख्य सेविकेच्या पदावर भरती करण्यासाठी लेखी परिक्षा घेण्यांत आली. लेख्री परिक्षेकरिता राज्यभरातून एकूण १३०० अंगणवाडी सेविकांनी लेखी परिक्षा दिली. ज्या उमेदवारांची मुख्य सेविकेच्या पदावरील भर्तीकरिता निवड झाली नाही अशा अंगणवाडी सेविकांना लेखी परिक्षेत गुण देताना परिक्षकांनी वस्तुनिष्ठ गुण दिलेले नाहीत व उमेदवारांचे गुण वाढविण्याबाबत भ्रष्टाचार झाला असण्याची शंका व्यक्त करण्यांत आली.

परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन करण्याची संघटनेच्या प्रतिाधिींना परवानगी देण्याची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने दिनांक ११.१२.२००६ च्या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी सोमवार दिनाांक १८.१२.२००६ ते शुक्रवार दिनांक २२.१२.२००६ या कालावधीत अंगणवाडी सेविकांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातील असे संघटनेच्या सरचिटणीसांना दिनांक १६.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्या अनुषंगाने ब-याच उमेदवारांनी स्वतःच्या उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या कालावधीत पाहिल्या आहेत. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उमेदवारांना लेखी कळविले नाही.

मुख्य सेविकेच्या पदावरील नेमणुकीसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेकरिता बसलेल्या उमेदवारांनी उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रतीच्या मागणीसाठी वैयक्तिक अर्ज करुन संघटनेच्या माध्यमातूनही उत्तरपत्रिका पहाण्यासाठी मिळण्याबाबत आग्रह धरल्यामुळे संघटनेला पत्र देऊन उमेदवारांना उत्तरपत्रिका दाखविल्या तर सर्वच उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिका पहाण्याची संधी मिळेल. यादृष्टीने आस्थापना शाखेने उमेदवारांना उत्तरपत्रिका बघण्याची कार्यवाही केली असावी असे जन माहिती अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले.

वरील विवेचन लक्षात घेता मुख्य सेविका पदावरील नेमणुकीसाठी एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्फे घेण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकेच्या परिक्षेच्या उत्तर पत्रिकांची पहाणी करण्याची सर्व संबंधित अंगणवाडी सेविकांना संधी देण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८२९३/२००६ दाखल केली होती. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने मुख्य सेविका पदावरील नेमणूकीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत केलेल्या तक्रारी निराधार असून, सदर लेखी परिक्षेच्या कार्यपध्दतीत पारदर्शकेतेचा अभाव आढळून येत नाही. वरील परिस्थितीत असे दिसून येते की,

अर्जदाराच्या मागणीबाबत योग्य प्रकारे विचार करण्यात आला असून, अपिलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५१२/०२**

**श्री. वेगान द्वारा ॲड.संजीव पुनालेकर** **------ अपीलकर्ता**
**३१५, बिरय्या हाऊस,**
**२६५, नरीमन स्ट्रीट,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,**
**भिवंडी, जिल्हा-ठाणे,**
**जुना एस.टी.स्टँड, कापआळी,**
**भिवंडी- ४२१ ३०२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,**
**भिवंडी, जिल्हा-ठाणे,**
**जुना एस.टी.स्टँड, कापआळी,**
**भिवंडी- ४२१ ३०२..**

. **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. वेगान यांच्यावतीने ॲड.संजीव पुनालेकर यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांच्याकडे अर्ज करुन रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तत्कालिन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ उप अभियंता श्री.पी.एम.पाटील, जन माहिती अधिकारी तथा तत्कालिन उप अभियंता, श्री.व्ही.एम.पटेल हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दि.२.७.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.वेगान यांच्यातर्फे ॲड.संजीव पुनालेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांच्याकडे दि. ६.११.२००६ रोजी अर्ज करुन रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीकरिता किती मर्यादा आहे, किती रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती केली आहे, रस्त्याच्या दुरुस्तीचे काम केव्हा सुरु केले याबाबतची जानेवारी, २००० ते नोव्हेंबर,२००६ या कालावधीतील माहिती, रस्त्याचे नांव, लांबी, रुंदी, अंदाजपत्रक, खर्च, रस्ता दुरुस्ती साठी लागलेली सामुग्री इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १६.११.२००६ रोजी ॲड. पुनालेकर यांना पत्र पाठवून भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्त्याबाबत मागितलेल्या माहितीसंबंधी समक्ष चर्चा करण्याकरिता कार्यालयात कामाच्या दिवशी सोमवार दि. २०.११.२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता बोलाविले होते. परंतु अपिलकार चर्चेकरिता हजर होते किंवा कसे याचा बोध होत नाही.अपिलकाराने सन २००० ते २००६ या कालावधीतील माहिती मागितली असल्याने सन २०००-२००६ सालाबाबतची माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे. माहिती संकलित झाल्यावर आपणांस पाठविण्यांत येईल असे दि. १.१२.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले.

जन माहिती अधिका-यांनी अद्याप माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांबाबत मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलकाराने सन २००० ते २००६ या कालावधीतील माहिती मागितली असल्याने सदर माहिती संकलित करण्यांत येत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. परंतु, अद्याप आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१८/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५१८/०२**

**श्री. प्रकाश जयसिंग सोनमळे,** **------ अपीलकर्ता**
**१३८/४०९४, पारिजात,**
**कन्नमवार नगर नं.२,**
**विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०० ०८३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**गटविकास अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सतारा.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ग्रामसेवक,पंचायत समिती, सातारा.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. प्रकाश सोनमळे यांनी दिनांक २८.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, पंचायत समिती, सातारा यांच्याकडे अर्ज करुन ग्रामपंचायत लिंब येथील घर क्रमांक ६९६, ७६६ व ७६८ बाबत माहिती मागितली. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे दिनांक २.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १७.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती सातारा, श्री.विश्वास सिद, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, श्री.ए.एस.जाधव, तसेच अपिलकार श्री.प्रकाश सोनमळे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रकाशे सोनमळे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक लिंब यांच्याकडे दिनांक २८.१२.२००६ रोजी अर्ज करुन ग्रामपंचायत लिंब, तालुका, जिल्हा सातारा येथील घर क्रमांक ६९६, ७६६ व ७६८ या घरांचे उतारे, घर क्रमांक ६९६ मधील अर्धे घर स्वत:च्या नांवावर करुन घेण्याकरिता अर्जदाराने केलेल्या

अर्जाची प्रत, ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या ठरावाची प्रत, घर क्रमांक ६९६ बाबत अर्जदाराने बांधकामाच्या परवानगीकरिता व नळ जोडणीकरिता केलेल्या अर्जाची प्रत व इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. माहिती मागण्याकरिता अपिलकाराने विभागातील अधिका-यांकडे चौकशी केली असता टोलवाटोलवीचे उत्तर देऊन माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, सातारा यांच्याकडे दिनांक २.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी लेखी अहवाल सादर केला. प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करणे, आदेश पारित करण्यासाठी विलंब झाल्याची कबूली दिली. अपिलकारास मोफत माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २७.५.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना सूचना दिल्या. अपिलकार श्री.प्रकाश सोनमळे यांना जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिंब, ता.जि.सातारा यांनी दिनांक ३१.५.२००८ च्या पत्रान्वये मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती दिली. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्याचे दिसते. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी राज्यात काटेकोरपणे करण्याची आवश्यकता आहे. तसेच भविष्यात मागणी अर्जावर / प्रथम अपिलावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u> -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५१६/०२**

**श्री. शेख मोहम्मद जावेद, ------ अपीलकर्ता**
**१०१, रुबी टॉवर्स, सहकार रोड,**
**एस.व्ही.रोड, अल्लाह वाली मस्जिद जवळ,**
**जोगेश्वरी (प.) मुंबई-४०० १०२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
**विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,**
**विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई-४०० ०१०**

**जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर उपायुक्त,**
**विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,**
**विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई-४०० ०१०. -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. शेख मोहम्मद जावेद यांनी दिनांक १.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर उपायुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या अपु-या प्रतिपूर्तीबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिनांक ३०.१२.२००६ च्या आदेशान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांच्याकडे दिनांक २०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन दि. १.३.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १७.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर उपायुक्त, श्री.टी.आर.रामनानी व तत्कालिन उपायुक्त श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी, तसेच अपिलकार श्री. शेख मोहम्मद जावेद हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या

अपिलकार श्री. शेख मोहम्मद जावेद यांनी माहितीच्या अधिकारात दि. १.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन त्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या अपु-या प्रतिपूर्तीबाबत पुढीलप्रमाणे माहिती मागितली.

(१) अपिलकाराच्या वैद्यकीय खर्चाच्या दाव्याबाबत लागू असलेल्या प्रतिपूर्ती कालमर्यादा अधिनियम, १९६३ नुसार कोणते कलम लागू होत आहे.

(२) अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई क्षेत्र यांचे दिनांक ११.२.२००४ रोजी मंजूर झालेल्या रुपये ७५,१७०/- अनुज्ञेय रकमेच्या परिगणनेची प्रत, अनुज्ञेय नसलेला खर्च रुपये ५२०/- कोणत्या आधारे लिहिला त्याची प्रत.

(३) वित्त विभागाने मंजूर केलेली अनुज्ञेय रक्कम रु.८८,८७५/- मधून अनुज्ञेय नसलेला खर्च रुपये ५२०/- वजा करुन मूळ रक्कम रु. ८८,३५५/- मिळाली पाहिले होती, याबाबत माहिती.

(४) बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार घेतला असता तर त्यासाठी लागणा-या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याचे शासनाचे मानस होते. तरी ते का देण्यांत आले नाही याची माहिती.

(५) अपिलकाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत आयुक्त यांनी काढलेली प्रस्तावाची प्रत.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराने मागणी केल्याप्रमाणे मुद्देनिहाय उत्तर दिनांक ३०.१२.२००६ च्या आदेशाने अपिलकारास दिले. त्यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांच्याकडे दि. २०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन दि. १ मार्च,२००७ रोजी आदेश पारित केले. त्यामध्ये अपिलकाराच्या अर्जातील मागितलेल्या माहितीसंबंधी पुनर्विचार करुन अर्जदारास तात्काळ अचूक माहिती पुरवावी असे आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. त्यामध्ये औषधोपचार व वास्तव्यावरील खर्चाच्या रकमेची परिगणना दि.२९.७.१९९९ च्या निर्णयानुसार करण्याची तसेच देयकातील अनुज्ञेय नसणा-या बाबीवरील खर्च वगळण्याची दक्षता घेण्याच्या सूचना विक्रीकर कार्यालयाने दि. १ मार्च,२००७ च्या ज्ञापनान्वये दिल्या. त्यानुसार अपिलकारास देय असणा-या खर्चाची परिगणना करुन देयक अधिदान व लेखा कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविले. लेखा अधिका-याने देयक मंजूर केले व सदर धनादेश अपिलकारास देण्यात आला.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकार श्री.शेख मोहम्मद जावेद, विक्रीकर अधिकारी वर्ग-१ यांना हृदयशस्त्रक्रिया या गंभीर स्वरुपाच्या आकस्मिकपणे उद्‌भवलेल्या आजारावर तातडीच्या उपचारासाठी मुंबई येथील डॉ.बालाभाई नानावटी या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यांत आले होते. यासाठी एकूण रु.१,०३,५८३/-एवढा खर्च आला. एक विशेष बाब म्हणून वास्तव्याचा खर्च रु,१२,०००/-वजा करुन अपिलकारास दि. २८.८.२००३ च्या वित्त विभागाच्या ज्ञापनान्वये रु.८८,८७५/-इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आली. याच आदेशामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २९ जुलै,१९९९ च्या निर्णयातील तरतुदीनुसार विहित टक्केवारीच्या मर्यादेत

औषधोपचार व वास्तव्यावरील खर्चाची परिगणना करावी.  तसेच देयकातील अनुज्ञेय नसलेल्या बाबीवरील खर्च वगळण्याची विक्रीकर कार्यालयाने दक्षता घ्यावी असे ज्ञापनात नमूद केले आहे.विक्रीकर कार्यालयाने दिनांक ११.२.२००४ च्या आदेशान्वये अनुज्ञेय नसलेल्या खर्चाची गणना करुन वित्त विभागाने अपिलकारास दिनांक २८.८.२००३ च्या आदेशान्वये मंजूर केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या रु.८८,८७५/- इतक्या रकमेपैकी रु.७५,१७०/- इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर केली.  कोणत्या बाबीवरील खर्च अपिलकारास अनुज्ञेय नाही, त्यामुळे रुपये १३,७०५/-इतकी रक्कम वजा केली यासंबंधी बाबनिहाय माहिती अपिलकारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की,हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५२२/०२**

**श्री. कृष्णाचंद रा.यादव,** **------ अपीलकर्ता**
**३/ ५०४, श्यामसुंदर को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**केशवराव कदम मार्ग,**
**मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य अधिकारी, सहकार कक्ष,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा),**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. कृष्णाचंद रामपत यादव यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा), यांचेकडे अर्ज करुन शामसुंदर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील ज्यांनी गाळे नावे नियमितीकरण/ हस्तांतरण केले आहे त्यांच्या लेट फी व्याजाबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा), यांचेकडे दि. ९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी यांच्या वतीने श्रीमती संध्या दि.लांडगे हया हजर होत्या. सुनावणीची नोटीस दि.२.७.२००८ रोजी यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार श्री.कृष्णाचंद रा.यादव हे हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.यादव यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा),यांचेकडे दि. ६.११.२००६ रोजी अर्ज करुन शामसुंदर सहकारी गृहनिर्माण सोसायटीमधील गाळे सप्टेंबर,१९९७ ते नोव्हेंबर, २००६ या कालावधीत हस्तांतरित केल्याची त्या गाळेधारकांची नांवे, गाळे क्रमांक आणि त्यासाठी आकारण्यात आलेली विलंब फी इ. ची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२८.११.२००६ व १९.१२.२००६ च्या पत्रांन्वये अपिलकारास सविस्तर माहिती दिली. या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पनर्बांधणी मंडळ (म्हाडा),यांचेकडे दि. ९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ९.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिनांक २८.११.२००६ व १९.१२.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास उपलब्ध करुन दिलेली आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची राज्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहिती अर्जासंबंधी आवश्यक ती कार्यवाही विहित कालावधीत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश -**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४५६/०२**

**श्री. कृष्णा केशव कामत,** **------ अपीलकर्ता**
**३९/ ४१, आयशाबाई मंझिल,**
**ब्लॉक नं.८, रुम नं.२, दुसरा मजला,**
**डॉ. महेश्वरी रोड, मुंबई-४०० ००९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,**
**वाणिज्य दक्षिण, दुसरा मजला, इलेक्ट्रीक हाऊस,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय अभियंता (दक्षिण) ग्रामक विद्युत,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिहवन उपक्रम,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. कृष्णा केशव कामत यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता (दक्षिण) ग्राहक विद्युत, बी.ई.एस.टी. कुलाबा, कुंबई यांचेकडे श्री.गजानन नारायण कामत यांच्या रुम नं.१ मध्ये विद्युत जोडणी दिल्याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, वाणिज्य (दक्षिण), कुलाबा, मुंबई यांचेकडे दिनांक १७.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, श्री.हिर्लेकर, जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता, श्री.राजेंद्र रा.पाटील, तसेच अपिलकार श्री.कृष्णा कामत हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कृष्णा कामत यांनी माहितीच्या अधिकारात दि. १०.८.२००७ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता यांचेकडे पुढील माहिती मागितली होती.

श्री.गजानन नारायण कामत रा.३९/४१, आयशाबाई मंझिल, रुम नं.१, तळमजला, डॉ.महेश्वर रोड, मुंबई यांच्या रुममध्ये मीटर क्रमांक ई ८२३२०१, दिनांक ३.१२.१९९६ दिले आहे. श्री. गजानन कामत यांनी यासाठी कोणते दस्तऐवज पुरावे सादर केले व अटी व नियम पूर्ण केल्यामुळे त्यांच्या रुममध्ये विद्युत जोडणी देण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. मीटर क्रमांक ई ८२३२०१ हा खूप पूर्वी बसविलेला आहे. त्यांसबंधीची कागदपत्र उपलब्ध नाहीत असे अपिलकारास जन माहिती अधिका-याने दि. ७.९.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांचेकडे दि. १७.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, श्री.गजानन नारायण कामत यांच्या ३९/४१, आयशाबाई मंझिल, रुम नं.१ मध्ये सन १९९६ मध्ये बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाने विद्युत मीटर जोडणी केली. सदर कालावधी लक्षात घेता उपक्रमाकडे यासंबंधीची कागदपत्र उपलब्ध नसल्याने माहिती दिली नाही. अपिलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसते. अपिलकाराच्या मागणीबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन उचित आदेश पारित करणे आवश्यक होते. याप्रकरणी जन माहिती अधिका-यांकडे कागदपत्र उपलब्ध नसल्याने अपिलकारास मागितलेली माहिती देता आली नाही असे दिसते. तसेच अपिलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्याने जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तरात काही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. मात्र, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांनी भविष्यात प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश -**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४८७/०२**

**श्री. सुनील भवरलाल कुमावत,** **------ अपीलकर्ता**
**मे. श्री ओम ऑटो पार्टस्, डिसिल्वा मार्ग,**
**गाळा नं.८,असल्फा, ए.जी.लिंक रोड,**
**घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**पूर्व उपनगरे**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप जिल्हाधिकारी (इ.एन.सी.)**
**कुर्ला डिव्हीजन, टोपीवाला कॉलेज बिल्डिंग,**
**मुलूंड, मुंबई-४०० ०८०.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुनिल भवरलाल कुमावत यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिंकारी (इएनसी) कुर्ला कार्य अधिकारी, मुलूंड, मुंबई यांचेकडे दि. ९.११.२००६ रोजी अर्ज करुन असलफा रस्त्याच्या रुंदीकरणामुळे विस्थापित झालेल्या पात्र लोकांची यादी व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पूर्व उपनगर यांचेकडे दि. १६.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक ११ जुलै,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पूर्व उपनगर, श्री.दि.क.जगदाळे, जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, कुर्ला कार्य अधिकारी, मुलूंड हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दिनांक ३०.६.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सुनिल कुमावत यांनी माहितीच्या अधिकारात दि. ९.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

मुंबई विकास प्रकल्पांतर्गत एम.एम.आर.डी.ए.कडून असल्फा रस्त्याच्या रुंदीकरणाकरिता (अंधेरी घाटकोपर लिंक रोडचा एक भाग) ताब्यात घेतलेल्या जागेमुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता तहसिलदार (अतिक्रमण) उप जिल्हाधिकारी (स्पार्क)यांनी तयार केलेल्या पात्र व्यक्तिंची परिशिष्ट-२ ची साक्षांकित प्रत, असल्फा येथील नकाशा क्र.९ अंतर्गत परिशिष्ट-२ स्पार्क आयडी क्र.२८ ची प्रत, पुनर्वसनाकरिता पात्रतेसाठी सादर केलेल्या व्यक्तिंची नांवे व कागदपत्रांच्या प्रती, सदर कागदपत्र तपासणा-या अधिका-याचे नांव व पदनाम याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे दि. १६.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली परिशिष्ट- II ची प्रत व इतर अनुषंगिक माहिती जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलावर सुनावणी घेतली नाही. आदेश पारित केले नाहीत. ही कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मी या परिस्थितीत असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची / आदेश पारित करण्याची जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी समज देण्यात येत आहे.

**आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३३४/०२**

**श्री. मुकेश सी. वोरा, ------ अपीलकर्ता**
**सम इंजिनियर्स प्रा.लि.**
**२६५, शिवशक्ती इंडस्ट्रीयल इस्टेट,**
**ऑफ. एम.बी.रोड,**
**अंधेरी (पूर्व.), मुंबई-४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**झोन-१२, शैलेंद्रनगर,**
**दहिसर (पूर्व), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, अपर पोलीस आयुक्त,**
**उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**
**ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) मुंबई-४०० १०१. -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. मुकेश सी.वोरा यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष, कांदिवली (पूर्व), मुंबई यांचेकडे दि. २०.४.२००६ रोजी अर्ज करुन दि. २१.२.२००२ व दि. २६.५.२००२ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रारीनुसार केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. अनुषंगाच्या गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले असून, गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. अपिलकारास आवश्यक असलेली माहिती न्यायालयाच्या कब्जात आहे. सदरची माहिती संबंधित न्यायालयाकडून प्राप्त करुन घेऊ शकता असे जन माहिती अधिका-यांनी दि. ११.५.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२, मुंबई यांचेकडे दि. ४.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २०.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दिनांक १६.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २० जून, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री. मुकेश व्होरा सुनावणीसाठी हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. मुकेश व्होरा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष, कांदिवली, मुंबई यांचेकडे दिनांक २०.४.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

"रॉयल पाम (१) प्रा.लि.आरे कॉलनी, गोरेगांव (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतच्या (S.R.S.) इमारत क्र.४, ५ अे, ५ ब या इमारतीच्या बांधकामाचे नुकसान झाले. इमारतीच्या छतास छिद्रे पडली. याबाबत अपिलकाराने दि.२१.५.२००२, २६.५.२००२ रोजी पोलीसांत तक्रार नोंदविली होती. तेव्हा पोलिसांमार्फत सदर इमारतीच्या छताचे फोटो काढण्यात आले होते. त्याच्या प्रती, तसेच इमारतीच्या छताचे फोटो काढताना पंचनामा करण्यात आला होता त्याची प्रत, फोटोग्राफरचे नांव व पत्ता उपलब्ध करुन देण्यात मागणी केली होती. अपिलकाराने मागणी केलेली माहिती न्यायालयाच्या ताब्यात असल्याने जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१२, मुंबई यांचेकडे दि. ४.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले."

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ११.५.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता हजर राहून अपिलकाराने त्यांचे म्हणणे सादर केले. अपिलकाराने मागितलेली माहिती ही न्यायालयाच्या कब्जात असल्याने ही माहिती अपिलकाराने न्यायालयाकडून घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कळविले. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा एक संच आरे सब पोलीस ठाण्यात असावा व त्यामधून कागदपत्राच्या प्रती मिळाल्या पाहिजेत असे अपिलकाराने प्रतिपादन केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी संबंधित नस्ती मागवून तपासली असता आरे सब पोलीस ठाणे यांनी तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सर्व मूळ कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यांत आली आहेत असे दिसून आले. दोषारोप पत्रामधील आवश्यक कागदपत्रांचा संच आढळून आला नाही.

आरे सब पोलीस ठाण्यामधील न्यायालयीन खटला क्र.०१/२००२, कलम ४०६, ४२०, ३४ भादविचे तपासी अधिकारी यांनी तपास पूर्ण करुन दोषारोप पत्रं दाखल केले. दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करताना मूळ कागदपत्रही न्यायालयात दाखल केली असल्याचे, तसेच दोषारोप पत्रामधील आवश्यक त्या कागदपत्रांचा संच अर्जदारास दिला आहे असे आरे सब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.मोरे यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी सांगितले. आरे सब पोलीस ठाण्यामध्ये कागदपत्रांचा संच उपलब्ध आहे व त्यातून कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात या अपिलकाराच्या म्हणण्यास आधार दिसून येत नाही. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास पुरविलेली माहिती योग्य आहे असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले.

वरील विवेचन लक्षात घेता खटला क्र.०१/२००२, कलम ४०६, ४२०, ३५ भादविचे तपास अधिकारी यांनी तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. त्यावेळी अपिलकारास दोषारोप पत्रातील कागदपत्रांचा संच अर्जदारास दिला आहे. तपास अधिका-यांनी मूळ कागदपत्र न्यायालयात दाखल केली आहेत. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा संच संबंधित नस्तीवर उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलकारास पुन्हा मागणीप्रमाणे कागदपत्र देता आली नाहीत असे स्पष्ट होते. तेव्हा या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**आदेश -**

**सबब, अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२४५०/०२**

**श्री. बापू भि. सुर्वे,** **------ अपीलकर्ता**
**४६/ क/ १०, जुनी चिखलवाडी,**
**टी. जे. रोड, मुंबई-४०० ००७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**एम.बी.आर.आर.बी. म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**एम.बी.आर.आर.बी. म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. बापू भि. सुर्वे यांनी जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक २७.३.२००६ रोजी अर्ज करुन (१) सी.टी.सर्व्हे क्र.३०९ येथील ४६/ ए ते एल, जुनी चिखलवाडी, टी.जे.रोड येथील सर्व गाळेधारकांची यादी, (२) म्हाडाकडून पुनर्बांधणीकरिता जेव्हा जागा अधिग्रहित करण्यात येते तेव्हा भाडेदारी हस्तांतरणाकरिता कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते, (३) त्याकरिता किती शुल्क आकारण्यात येते, याबाबतीत कोणती कार्यपध्दती अवलंबण्यात येते, याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक ३०.५.२००६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. सदर अपिलावर अपिलीय अधिका-यांनी दिनांक १५.७.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील निकाली काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई तसेच अपिलकार श्री.बापू सुर्वे हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.बापू भिकाजी सुर्वे यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.३०९ येथील गाळेधारकांची यादी, भाडेदारी हस्तांतरणाची कार्यपध्दती इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सी.टी.सर्व्हे क्र.३०९ येथील ४६ ए ते एलच्या गाळेधारकांची यादी मागितली असताना निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी ८५१/सी ते ८८१/सी ची माहिती दिली.त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे दिनांक ३०.५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १५.७.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीच्यावेळी अनिपलकार हजर नव्हते. यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकाराचे प्रथम अपील निकालात काढले असल्याचे आदेश पारित केले. प्रथम अपिलाच्या दि. १५.७.२००६ च्या सुनावणीची नोटीस अपिलकारास दि. १७.७.२००६ रोजी मिळाली. त्यामुळे अपिलकार प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी हजर राहू शकले नाहीत असे अपिलकाराने प्रतिपादन केले. विहित कालावधी उलटून गेल्यानंतर चुकीची अपूर्ण माहिती दिली. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी, तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडा यांनी अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि. २७.३.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकार सुनावणीसाठी हजर नसल्याच्या कारणा वरुन अपील निकालात काढले. अपिलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांची ही कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमजबजावणी करणे आवश्यक आहे. तेव्हा या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास मागणीप्रमाणे ३० दिवसांचे आत माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अर्जास विहित कालावधीत माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१७/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५०२/०२**

**श्री. चारुहास अनंत हंबीरे, ------ अपीलकर्ता**
**द्वारा-मच्छिमार मासे विक्रेते संघ,**
**२५,तळमजला, मृदुंगाचार्य नारायणराव कोळी को.ऑप.हौ.सोसा.**
**माहिम कॉजवे रोड,**
**माहिम (प.), मुंबई-४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह मुख्य अधिकारी, कक्ष क्र.४०२,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, कक्ष क्रमांक ३६९,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. चारुहास अनंत हंबीरे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि.१८.८.२००६ रोजी अर्ज करुन मच्छिमार नगर माहिम कोळी को.ऑप.हौ.सोसायटी (किनारा) संबंधी माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि. १२.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने आदेश पारित करुनही मच्छिमार नगर माहिम कोळी को.ऑप.हौ.सोसा. यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १४.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१, श्री.बी.के.हांडे तसेच अपिलकार श्री.चारुहास हंबीरे हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. चारुहास हंबीरे यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन मच्छिमार नगर माहिम कोळी को.ऑप.हौ.सोसायटी (किनारा) संबंधी एकूण ११ मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, मुंबई गृहनिर्माण व

क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती संस्था पातळी वरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यात यावी असे उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी दि. ८.९.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडे दिनांक १२.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ८.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीवर प्रथम अपिलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

"महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी बाजीराव शिंदे, उपनिबंधक, सहकारी संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, माहिम मच्छिमार नगर माहिम कोळी किनारा को.ऑप.हौ.सोसा.लि.श्री.चारुहास हंबीरे यांनी या कार्यालयाकडे मागितलेली माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन देण्याकरिता श्री. वसंत शिंदे यांनी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. "

माहिम मच्छिमार नगर माहिम कोळी (किनारा) को.ऑप.हौ.सोसायटीच्या चेअरमन /सेक्रेटरीने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-याकडे उपलब्ध नाही. सदर माहिती संस्था पातळीवरील आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयात अंशतः बदल करतो. मच्छिमार नगर माहिम कोळी को.ऑप.हौ.सोसायटीच्या चेअरमन /सेक्रेटरी यांना असे आदेश देतो की, अपिलकार श्री.चारुहास हंबीरे यांनी संस्थेबाबत मागितलेल्या एकूण ११ मुद्दयांबाबतची माहिती विहित शुल्क आकारुन व हे आदेश प्राप्त झाल्या पासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/३५१/०२**

**श्री. हायजिनस सिल्वेस्टर डिलिमा, ------ अपीलकर्ता**
**हरविश, ६९-अ, गावठण लेन नं.१,**
**अंधेरी, मुंबई-४०० ०५८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**के/पश्चिम, बी.एम.सी.कार्यालय,**
**पालीराम पथ, अंधेरी, मुंबई-४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारती/कारखाने),**
**के/पश्चिम, बी.एम.सी.कार्यालय,**
**पालीराम पथ, अंधेरी, मुंबई-४०० ०५८. -------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. हायजिनस सिल्वेस्टर डिलिमा, यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती/कारखाने), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि. ७.१२.२००६ रोजी अर्ज करुन बुरानी मंझिल, कसम चौहान इमारत, हालीमा मंझिल येथील विविध घराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २१.२.२००७ रोजी पाारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक २०.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम, अंधेरी, श्री.सुनिल मु. धामणे, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम, अंधेरी, श्री. बा. म. साळवे, तसेच अपिलकार श्री.हायजिनस डिलिमा हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. डिलिमा यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम, अंधेरी यांचेकडे दि. ७.१२.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(अ) घर क्र.६८ (बुराणी मंझिल) झीलून इमारत आणि घर क्र.७६, गल्ली क्र.१

(ब) कसम चौहान इमारत, घर क्र.७ आणि चौहान मंझिल, गल्ली क्र.२

(क) हालीमा मंझिल, गल्ली क्र.४/ रॉक गल्ली.

सदर इमारती ज्या प्लॉटरवर आहेत त्या प्लॉटचे क्षेत्रफळ किती, इमारतीचे क्षेत्रफळ किती, सदर बांधकाम वैध की अवैध आहे, बांधकाम वैध असल्यास मंजूर प्लॅनच्या छायांकित प्रती व अनुषंगिक कागदपत्राच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिनांक २४.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १५.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकारास १० दिवसांचे आत सुधारित माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २१.२.२००७ रोजी आदेश पारित केले.

मागितलेल्या प्लॉटच्या क्षेत्रफळाची माहिती सीटी सर्व्हे अधिकारी यांचेशी संबंधित असल्याने त्यांचेकडून उपलब्ध होऊ शकते. इमारतीच्या बांधकामाबाबतची माहिती जाणिवपूर्वक शोध घेऊनही कागदपत्र उपलब्ध झाले नाहीत. सदर माहिती कार्यकारी अभियंता (बी.पी.) के/विभाग यांचेकडे उपलब्ध असल्याने सदर माहिती त्यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी दिनांक २१.२.२००७ च्या पत्रान्वये सुधारित उत्तर दिले.

सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) ), बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम, अंधेरी, मुंबई यांनी दिनांक २६.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास मुद्देनिहाय माहिती दिली. जन माहिती अधिका-याने अपुरी /खोटी माहिती दिली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती सीटी सर्व्हे ऑफीसर, महानगरपालिका, अंधेरी आणि कार्यकारी अभियंता (इमारती व कारखाने) के/पश्चिम यांचेशी संबंधित आहे. तसे सहायक अभियंता (इमारती व कारखाने) के/पश्चिम यांनी अपिलकारास दि. २१.२.२००७ च्या पत्राने कळविले. पैकी सहायक अभियंता (इमारती व कारखाने) के/पश्चिम यांनी काही माहिती दिली. परंतु अपिलकाराने मागितलेली पूर्ण माहिती दिलेली नाही असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगाकडे पाठवावा.

**आदेश -**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४९४/०२**

**श्री. पी. डी. वर्गीस, ------ अपीलकर्ता**
**६/१७, आसीसी को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**पी. एल. लोखंडे मार्ग, मुंबई-४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, एम विभाग,**
**कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला,**
**कोकण भवन, नवी मुंबई-४०० ६१४.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, एम विभाग,**
**कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला,**
**कोकण भवन, नवी मुंबई-४०० ६१४ -----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. पी. डी. वर्गीस यांनी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, एम विभाग, मुंबई यांच्याकडे दि. १८.९.२००६ रोजी अर्ज करुन एम विभागातील गृहनिर्माण संस्थंची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, एम (२) यांच्याकडे दि. १८.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१६.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. त्या दिवशी अपिलकार श्री.वर्गीस यांना उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली व त्यांचे अपील फेटाळले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई, श्री.मिलिंद बोरीकर, तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.संदिप देशमुख, जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एम विभाग, श्री.महेंद्र म्हस्के, तत्कालिन जन माहिती अधिकारी, श्री.सुनिल देशमुख हजर होते. यु.पी.सी.ने सुनावणीची नोटीस पाठवूनही अपिलकार श्री.वर्गीस सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.पी.डी.वर्गीस यांनी माहितीच्या अधिकारात दि.१८.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे अर्ज करुन खालील तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती.

(१) एम विभागामध्ये किती गृहनिर्माण संस्थांची नोंदणी करण्यात आलेली आहे ?

(२) किती गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिका-यांनी पदभार स्वीकारल्यापासून १५ दिवसांचे आत बंधपत्रे स्वीकारलेले आहेत व किती संस्थांची १५ दिवसांच्या नंतर बंधपत्र सादर केलेले आहेत,

(३) बंधपत्र सादर न करणा-या संस्थांची पदाधिका-यांवर या कार्यालयामार्फत काय कारवाई करण्यात आलेली आहे,

वरील मुद्दयांबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-याने दि.२५.९.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-याने परिशिष्ट-अे बाबतची माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून दि. १६.११.२००६ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिका-यांली सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.८.२.२००६ च्या परिपत्रकाचा आधार घेऊन सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार हा कायदा लागू होत नाही असे आदेश पारित करुन अपिलकाराचे प्रथम अपील फेटाळले. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता मुद्दा क्र.१ बाबतची माहिती अपिलकारास जन माहिती अधिका-याने दिली आहे. मुद्दा क्र.२ व ३ बाबत सर्व संस्थांची माहिती जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होत नाही. परंतु सदर कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार चार संस्थांची माहिती प्राप्त झाली. बंधपत्र न केलेल्या संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ अन्वये कार्यवाही करुन व्यवस्थापक समिती बरखास्त करण्यात आल्याचे जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.

२५.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर समर्पक असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

**<u>आदेश</u> -**

**सबब, अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४८९/०२**

**श्रीमती विद्या वैद्य,,** **------ अपीलकर्ता**
**बी-५५, पारिजात, ५, केसी मार्ग,**
**वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय,**
**कला शाळा आवार,**
**डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय,**
**कला शाळा आवार,**
**डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्रीमती विद्या वैद्य यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे दि.२८.७.२००६ रोजी अर्ज करुन सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालयासाठी प्रा.एम.जे.राजाध्यक्ष यांनी मान्यवर कलाकारांकडून संकलित केलेल्या पेंटींग संदर्भातील प्रमाणित यादीच्या प्रतींची मागणी केली. अपिलकाराने मागणी केलेले कागदपत्र कला संचालक यांच्या कार्य क्षेत्रातील असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकार श्रीमती वैद्य यांना दिनांक १०.८.२००६ च्या पत्रान्वये कळविले. कला संचालनालयातील जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास असे कळविले की, अपिलकाराने मागितलेली माहिती कला संचालनालयाशी संबंधित नसून सदर माहिती सर ज.जी.उपयोजित कला महाविद्याल, मुंबई यांच्या कार्यकक्षतील असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत दि. १४.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दिनांक ८.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात

आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, प्रा.गो. गो. वाघमारे, प्रमुख लिपिक/ सहायक माहिती अधिकारी, कु. अ.वि.चव्हाण, प्रमुख लिपिक, श्री.मि.ग.उपाध्ये हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दिनांक ३०.६.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार श्रीमती वैद्य सुनावणीसाठी हजर नव्हत्या.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणीच्यावेळी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती वैद्य यांनी माहितीच्या अधिकारात दि.२८.७.२००६ रोजी अर्ज करुन सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालयातील माजी अधिष्ठाता प्रा.एम.जी.राजाध्यक्ष यांनी महाविद्यालयासाठी /विद्यार्थ्यांसाठी मान्यवर कलाकारांकडून संकलित केलेल्या चित्रांच्या प्रमाणित यादीची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे मागणी केली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांशी संबंधित नसल्याचे अपिलकारास दि.१०.८.२००६ च्या पत्रान्वये कळविले. तसेच माहितीकरिता कला संचालक यांच्याशी संपर्क साधण्याबाबत अपिलकारास कळविले. परंतु अपिलकाराने मागितलेली माहिती कला संचालनालयाशी संबंधित नव्हती. त्यामुळे कला संचालनालयातील जन माहिती अधिकारी श्री.झोंबाडे यांनी सदर माहिती सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई यांच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत अपिलकारास दि.१४.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि..८.११.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीच्यावेळी अपिलकारास जन माहिती अधिका-याने दिनांक १६.५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबतचा लेखी अहवाल सादर केला.

वरील परिस्थिती मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४९१/०२**

**श्री. किसन रामचंद्र किळजे,** **------अपीलकर्ता**
**गोकुळ ब इमारत, रुम नं.४११, ५३१,**
**ना.म.जोशी मार्ग, बकरी अड्डा,**
**मुंबई-४०० ०११.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**संचालक (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प),**
**महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत, ३ रा मजला,**
**महानगरपालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**इमारत प्रस्ताव, शहर विभाग, ई विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.किसन रामचंद्र किळजे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता, इमारत प्रस्ताव, शहर विभाग, ई विभाग कार्यालय,भायखळा, मुंबई यांचेकडे दि. २७.१०.२००६ रोजी अर्ज करुन गोकुळ "ब " इमारतीचे मंजूर प्लॅनबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. २१.११.२००६ रोजी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, महानगरपालिका यांचेकडे दिनांक २०.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांनी निराशाजनक उत्तर दिल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार श्री. किसन किळजे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या अपिलकार श्री.किसन रामचंद्र किळजे यांनी माहितीच्या अधिकारात दि.२७.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता,इमारत प्रस्ताव, शहर विभाग, ई विभाग कार्यालय,भायखळा, मुंबई यांच्याकडे ५२७-५३३, ना.म.जोशी मार्ग, बकरी अड्डा येथील नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत पुनर्रचित गोकुळ "ब " इमारतीचे मंजूर प्लॅनची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधीची कागदपत्रे जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडत

नसल्याने संबंधित कागदपत्र सापडल्यानंतर लगेचच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने म्हाडाकडून आवश्यक माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे दि. २१.११.२००६ च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, (अभियांत्रिकी सेवा आणि प्रकल्प) महानगरपालिका मुख्यालय, मुंबई यांच्याकडे दि. २०.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१२.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार तसेच जन माहिती अधिका-यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलकाराने मागितलेली कागदपत्र जुनी आहेत. जुनी कागदपत्र सहज उपलब्ध होत नाहीत. सदर कागदपत्रांचा मेहनतीपूर्वक शोध घ्यावा. यासंदर्भात अपिलकारास दोन आठवडयाच्या आत कळवावे. कागदपत्र उपलब्ध असल्यास आवश्यक ते शुल्क भरुन देण्यात यावे. म्हाडा/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळ हे देखिल तत्सम अभिलेख ठेवत असल्यामुळे अपिलकारास आवश्यक असलेली कागदपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी त्या प्राधिकरणाकडे संपर्क साधावा असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील निकालात काढले.

अपिलकाराने द्वितीय अपिलाच्या कागदपत्रासोबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.८.१२.२००६ च्या पत्राची प्रत सादर केली आहे. यावरुन गोकुळ इमारतीचे बांधकाम राजीव गांधी निवारा प्रकल्पा अंतर्गत करण्यात आले. सदर प्रकल्प बंद झाल्यावर प्रकल्पातील नस्त्या पुनर्रचना विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. परंतु, गोकुळ इमारतीची नस्ती मंडळाकडे हस्तांतरित न झाल्यामुळे बांधकाम नकाशाची प्रत देता येत नसल्याचे वरील पत्रात नमूद केले आहे.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कागदपत्र उपलब्ध होत नसल्याच्या कारणावरुन माहिती दिलेली नाही. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे गोकुळ "ब " इमारतीची नस्ती हस्तांतरित झाली नसल्यामुळे त्यांच्याकडेही अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध नाही असे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**<u>आदेश</u> -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४९५/०२**

**श्री. मुरलीधर श्रीराम शिंपी,** **------अपीलकर्ता**
**१९, गुरुतपस्या, कस्तुरी पार्क,**
**बोरीवली (प.), मुंबई-४०० ०९२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**नं.३, सहकारी संस्था, पश्चिम उपनगर,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, आर विभाग, मुंबई,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला. जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.मुरलीधर श्रीराम शिंपी यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, आर विभाग, मल्होत्रा हाऊस. फोर्ट, मुंबई यांच्याकडे दि. ७.८.२००६ रोजी अर्ज करुन बोरीवली, गुरुतपस्या संस्थेचा अनागोंदी कारभार व संस्थेचे खजिनदार श्री.व्ही.एस.माहीमकर यांनी संस्थेच्या पैशाचा अपहार केल्याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ०८.०९.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, (नं.३) सहकारी संस्था, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. २१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.४.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.४.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी युपीसीने दि. ३०.६.२००८ रोजी नोटीस पाठवूनही जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. मुरलीधर शिंपी यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-यांकडे दि.७.८.२००६ रोजी अर्ज करुन बोरीवली, गुरुतपस्या सोसायटीच्या अनागोंदी कारभाराबाबत तसेच संस्थेचे खजिनदार श्री.व्ही.एस. माहीमकर यांनी संस्थेच्या पैशाचा केलेल्या अपहाराबाबत अशी एकूण १९ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती

अधिका-यांनी दि. ८.९.२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. सदर उत्तराचे अवलोकन केले असता, अपिलकाराने सहकार न्यायालयात केस नं.अेबीएन/सीसी/४/३९७/२००२, दि. १९.८.२००२ रोजी दावा दाखल केला आहे. अपिलकाराच्या तक्रार अर्जातील मुद्दे त्यात समाविष्ट केले असल्याने सदर बाब न्यायप्रविष्ट आहे. या कारणावरुन अपिलकाराने संस्थेतील भ्रष्टाचाराबाबत चौकशी करण्याकरिता दि.२५.२.२००२ व १५.९.२००३ मध्ये दाखल केलेल्या अफरातफरीच्या तक्रारीविषयी काय कार्यवाही करण्यात आली याबाबत अपिलकारास माहिती दिलेली नाही. उप निबंधक कार्यालयाने बोरीवली, गुरुतपस्या संस्थेच्या दफ्तराची तपासणी केली असून, तपासणी अहवालात आढळून आलेल्या दोषांबाबत कार्यालयीन का.क.७८ (१) अन्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीला दि. ७.११.२००४ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली असल्याचे नमूद केले आहे. सहकार न्यायालयात दावा दाखल केला असून, सदर बाब न्यायप्रविष्ट असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे दिसते.

बोरीवली, गुरुतपस्या संस्थेच्या कारभाराबाबत मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याने दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे दि. २१.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु त्याबाबत आवश्यक ते आदेश पारित केल्याचे किंवा अपिलकारास माहिती दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२४०/०२**

**श्री. दत्तात्रय अनंतराव चौधरी,** **------अपीलकर्ता**
**९१, पौर्णिमा, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई-४०० ०३०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. दत्तात्रय अनंतराव चौधरी यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ६.११.२००६ रोजी अर्ज करुन त्यांच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीचा पोलीस महासंचालकांनी महाराष्ट्र शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. २३.११.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २५.१.२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि. २२.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.६.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, श्री.कै.वि.बिलोणीकर, गृह विभाग, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, श्री.सु.ज.महाजन, गृह विभाग, तसेच अपिलकार श्री.दत्तात्रय चौधरी हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. दत्तात्रय चौधरी यांनी माहितीच्या अधिकारात दि. ६.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथर अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांचेकडे खालील माहिती मागितली होती.

(अ) अपिलकाराच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीचा, पोलीस महासंचालकांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला असल्यास त्याची प्रत.

(ब) राज्य शासन व पोलीस महासंचालक यांचेमध्ये अपिलकाराच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीबाबत झालेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती.

(क) अपिलकाराच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता गठीत केलेल्या समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत.

(ड) मा. उच्च न्यायालयात शासनाच्यावतीने शपथपत्र दाखल करण्यासंबंधी मंजुरी घेण्याकरिता तसेच अधिव्याख्याता यांचा सल्ला घेण्याकरिता अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांनी सादर केलेल्या टिप्पणीच्या प्रती.

(इ) विधी व न्याय विभाग, अधिव्याख्याता यांनी दिलेल्या सल्ल्याच्या प्रती.

(फ) अपिलकाराच्या मुदतपूर्व सेवानिवृत्तीसंबंधी अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांच्या कार्यालयाकडून झालेल्या पत्रव्यवहार व टिप्पणीच्या प्रती.

अपिलकाराने त्यांचे मुदतपूर्व सेवानिवृत्तीसंबंधी मा. उच्च न्यायालयात रीट याचिका क्रमांक २४६१/०३ महाराष्ट्र शासनाच्या विरुध्द दाखल केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (ख) अनुसार जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दिनांक २२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रकरण रीट याचिका क्र.२४६१/०३ मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (ख) अनुसार प्रथम अपील फेटाळण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्री. दत्तात्रय चौधरी यांना मुदतपूर्व शासन सेवेतून निवृत्त करण्यात आले आहे. त्यामुळे सदर सक्तीच्या सेवानिवृत्तीविरुध्द अपिलकारांनी महाराष्ट्र शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. २४६१/०३ दाखल केली आहे. या संदर्भात शासनाच्यावतीने मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले असावे. तेव्हा अपिलकाराने मागितलेली कागदपत्र अपिलकारास देण्यास मा. उच्च न्यायालयाने मनाई केली नसेल तसेच मा. उच्च न्यायालयाचा अवमान होणार नसेल तर अपिलकाराने मागितलेली माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत देण्यात यावी.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई/दिनांक :-१४/०७/२०**

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४६३/०२**

**डॉ. एस. एस. प्रभू,** **------अपीलकर्ता**
**बी-२३, उद्यानप्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार डॉ.श्रीकांत सखाराम प्रभू यांनी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांचेकडे दि.२४.७.२००६ रोजी अर्ज करुन शास्त्रीनगर द्वारका सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.या संस्थेच्या कारभाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडे दि.२७.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.७.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, श्री.बी.के. हांडे तसेच अपिलकार डॉ. एस.एस.प्रभू हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू यांनी माहितीच्या अधिकारात दि.२४.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांचेकडे अर्ज करुन शास्त्रीनगर द्वारका को. ऑप. हौ .सोसा.लि.च्या अनागोंदी कारभाराबाबत, संस्थेने कायद्याने दरवर्षी संविधानिक लेखा परिक्षण करणे बंधनकारक असताना सन १९९२-९३ पासून संविधानिक लेखा परिक्षण केले नाही. याबाबत संस्थेच्या विरुध्द काय कारवाई करण्यांत आली, संस्थेविरुध्द कारवाई केली नसल्यास त्याबाबतची कारणे, तसेच उपनिबंधक श्री.प्रभाकर अहिरे, उपनिबंधक श्री.शेंडे यांच्या

प्रतिनियुक्ती/बदलीच्या तारखा व वर्ष, त्यांचे मासिक वेतन अशी अनुषंगिक माहिती, तसेच कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दि.०३.०१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. अपिलकाराने संपूर्ण माहिती दिली नाही, कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी दिली नाही, आवश्यक कागद पत्रांच्या साक्षांकित प्रती दिल्या नाहीत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २७.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.५.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिले. "उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाने प्रमाणित लेखा परिक्षकांची यादी, त्यांना देण्यात येणारी फी, फी देण्यात येत नसल्यास त्यांना मिळणा-या टक्केवारीचे प्रमाण ही सर्व माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावी. जेणेकरुन अर्जदारांना योग्य ती माहिती मिळेल. तसेच यापुढील कामकाजात सुधारणा होईल." श्री.प्रभाकर अहिरे, उपनिबंधक व श्री.शेंडे, सहकारी अधिकारी यांचेसंबंधीची सेवा विषयक माहिती तसेच संस्थेचे कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणाला नेमण्यात येते, कशाच्या आधारे नेमण्यात येते, त्यांचे निकष काय आहेत इ.माहिती देणेबाबत आदेश दिले. अपिलीय अधिका-यांच्या सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-याने माहिती प्रकट केली नाही, नागरिकांची सन प्रसिध्द केली नाही. अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.०३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू यांच्या मागणीप्रमाणे त्यांना जन माहिती अधिका-याने पूर्ण माहिती दिली नाही. अपूर्ण माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.१२.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार माहिती नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली नाही. यामुळे अपिलकारास अद्याप आवश्यक माहिती मिळालेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४९२/०२**

**श्री. श्रीकात सखाराम प्रभू, ------अपीलकर्ता**
**बी-२३,उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२**
**विलेपार्ले, मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई मंडळ, म्हाडा, गृहनिर्माण भवन.**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**म्हाडा, रुम नं.३६९, दुसरा मजला,**
**मुंबई मंडळ, म्हाडा, गृहनिर्माण भवन.**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ ------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार डॉ. श्रीकांत सखाराम प्रभू यांनी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांचेकडे दिनांक ०९.१०.२००६ रोजी अर्ज करुन मुख्य अधिकारी कार्यालयात दि.१६.१२.२००४ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेले आदेश तसेच तक्रार क्र.२२३४/२००६ बाबत मा.उप लोक आयुक्तांना पाठविलेला अहवाल या दोन्ही बाबींची सद्यःस्थितीची माहिती व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने दि. ०९.०१.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि.१७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, श्री.बी.के.हांडे तसेच अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू, यांनी माहितीच्या अधिकारात दि.९.१०.२००६ रोजी अर्ज करुन, मुख्य अधिकारी कार्यालयात दि.१६.१२.२००४ रोजी सुनावणी आयोजित करुन पारित केलेले आदेश तसेच तक्रार क्र.२२३४/२००६ संबंधी मा.उप लोकआयुक्त कार्यालयास सादर केलेल्या अहवालासंबंधीची सद्यःस्थिती,तक्रारीबाबत संबंधित अधिका-यांनी केलेली टिप्पणी, नोंदविलेले अभिप्राय, याबाबत केलेली कार्यवाही यासंबंधी टप्पेनिहाय माहिती द्यावी. तक्रार कोणत्या अधिका-याकडे केव्हा पोहोचली, किती काळ ती त्या अधिका-याकडे काही कार्यवाही न करता प्रलंबित राहिली, काहीही कार्यवाही न करता प्रलंबित रहाण्याची कारणे इ. अनुषंगिक बाबींची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांचेकडे दि. ९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत, माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, मुंबई, यांनी अर्जदारास मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, गृहनिर्माण भवन, मुंबई यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत, माहिती दिली नाही. सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती द्यावी. भविष्यात अशी घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u> -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४९३/०२**

**डॉ. एस. एस. प्रभू,** **------अपीलकर्ता**
**बी-२३, उद्यानप्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार डॉ.श्रीकांत सखाराम प्रभू यांनी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांचेकडे दि.२७.१०.२००६ रोजी अर्ज करुन शास्त्रीनगर द्वारका सहकारी गृहनिर्माण सोसायटी लि.या संस्थेच्या कारभाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. संपूर्ण माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडे दि.०९.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, श्री.बी.के. हांडे तसेच अपिलकार डॉ. एस.एस.प्रभू हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू यांनी माहितीच्या अधिकारात दि.२७.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई, यांचेकडे अर्ज करुन शास्त्रीनगर द्वारका को. ऑप. हौ .सोसा.लि.च्या अनागोंदी कारभाराबाबत, संस्थेने कायद्याने दरवर्षी संविधानिक लेखा परिक्षण करणे बंधनकारक असताना सन १९९२-९३ पासून संविधानिक लेखा परिक्षण केले नाही. याबाबत संस्थेच्या विरुध्द काय कारवाई करण्यांत आली, संस्थेविरुध्द

कारवाई केली नसल्यास त्याबाबतची कारणे, तसेच उपनिबंधक श्री.प्रभाकर अहिरे, उपनिबंधक श्री.शेंडे यांच्या प्रतिनियुक्ती/बदलीच्या तारखा व वर्ष, त्यांचे मासिक वेतन अशी अनुषंगिक माहिती, तसेच कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दि.०३.०१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. अपिलकाराने संपूर्ण माहिती दिली नाही, कागदपत्रांची तपासणी करण्यास परवानगी दिली नाही, आवश्यक कागद पत्रांच्या साक्षांकित प्रती दिल्या नाहीत. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि.०९.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२९.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.०५.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे आदेश दिले. "उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाने प्रमाणित लेखा परिक्षकांची यादी, त्यांना देण्यात येणारी फी, फी देण्यात येत नसल्यास त्यांना मिळणा-या टक्केवारीचे प्रमाण ही सर्व माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावावी. जेणेकरुन अर्जदारांना योग्य ती माहिती मिळेल. तसेच यापुढील कामकाजात सुधारणा होईल." श्री.प्रभाकर अहिरे, उपनिबंधक व श्री.शेंडे, सहकारी अधिकारी यांचेसंबंधीची सेवा विषयक माहिती तसेच संस्थेचे कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणाला नेमण्यात येते, कशाच्या आधारे नेमण्यात येते, त्यांचे निकष काय आहेत इ.माहिती देणेबाबत आदेश दिले. अपिलीय अधिका-यांच्या सदर आदेशानुसार जन माहिती अधिका-याने माहिती प्रकट केली नाही, नागरिकांची सन प्रसिध्द केली नाही. अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकार डॉ.एस.एस.प्रभू यांच्या मागणीप्रमाणे त्यांना जन माहिती अधिका-याने पूर्ण माहिती दिली नाही. अपूर्ण माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.५.१२.२००६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार माहिती नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली नाही. यामुळे अपिलकारास अद्याप आवश्यक माहिती मिळालेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**<u>आदेश</u> -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४८८/०२**

**श्री. अजिज एच. छोटाकाझी,** **------अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.२१ अ, ५ वा मजला,**
**अंधेरी गुलमोहर को.ऑप.हौ.सोसायटी,**
**सी.डी.बर्फीवाला मार्ग, अंधेरी (प.)**
**मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के-पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प.), मुंबई.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.अजीज एच. छोटाकाझ ी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने), के-पश्चिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.२६.९.२००६ रोजी अर्ज करुन अंधेरी गुलमोहर को.ऑप.हौ.सोसायटी, या संस्थेसंबंधीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त, महानगरपालिका, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि.१३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,महानगरपालिका, के/पश्चिम विभाग, श्री.सुनिल धामणे तसेच अपिलकार श्री.अजिज एच.छोटाकाझी हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अजिज एच.छोटाकाझी यांनी माहितीच्या अधिकारात दि.२६.९.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांचेकडे खालील माहिती मागितली होती.

(१) अंधेरी (पश्चिम) बर्फीवाला मार्गावरील सी.टी.सर्व्हे क्र.५३४, ५३४/१, ५३४/२ येथील अंधेरी गुलमोहर को.ऑप.हौ.सोसायटीच्या इमारत क्र.ए.बी.सी. संबंधीच्या मूळ नकाशाची प्रत.

(२) सदर इमारतीतील काही गाळयांची सहाय्यक आयुक्त, श्री.सुनिल धामणे यांनी अधिक्षक अभियंता श्री. कुपले यांच्या समवेत तपासणी केली होती, त्या तपासणी अहवालाची प्रत.

(३) सदर इमारतीमधील काही गाळेधारकांनी अनधिकृतपणे सज्जाची बांधणी केली त्यासंबंधी केलेल्या तपासणीची प्रत.

(४) अवैधरित्या ज्या गाळेधारकांनी सज्जाचे बांधकाम केले आहे त्याची छायाचित्रे घेण्यात आली आहेत, त्या छायाचित्राच्या प्रती.

(५) के/पश्चित विभागाच्या जन माहिती अधिका-याचे नांव, पदनाम, विभाग आणि पत्ता उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती.

(६) अपिलकाराने सदर सोसायटीमधील गाळेधारकांनी केलेले अनधिकृत बांधकाम/ फेरफार यासंबंधी दि.१०.२.२००६ व १९.६.२००६ रोजी केलेल्या तक्रारीसंबंधी केलेली कारवाई.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महानगरपालिका यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे दि. ७.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.१२.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन दि.११.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. सदर अपिलाच्या सुनावणीचेवेळी अपिलकारास संबंधित फाईल तपासणीसाठी दिली. तपासणीनुसार काही प्रतीच्या छायाप्रतींची अपिलकाराने मागणी केली. मागणी केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती सात दिवसांत देणेबाबत आदेश पारित केले असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ११.७.२००८ रोजी आयोगाच्या सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.

. वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही अपिलकारास मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. अपिलकारास जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी मागणीप्रमाणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**<u>आदेश</u> -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४२०/०२**

**श्री. शांताराम भिकोबा बोधे,** **------अपीलकर्ता**
**५. हरिपद सोसायटी, जयविजय सोसायटीजवळ**
**पारशीवाडा, सहार रोड,**
**विलेपार्ले, मुंबई-४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन),**
**आयुक्त व प्रादेशिक संचालक,**
**नगरपालिका प्रशासन यांचे कार्यालय,**
**विधानभवन, पुणे- ४११ ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद,पांचगणी,**
**ता. महाबळेश्वर, जि. सातारा-४१२ ८०५.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार शांताराम भिकोबा बोधे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, पांचगणी गिरीस्थान नगरपरिषद, जि. सातारा यांचेकडे दि.२७.७.२००६ रोजी अर्ज करुन मिळकत क्र.४७९/१४ चे मिळकत कराबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी प्रत्येक पानासाठी रु.२५/-प्रमाणे एकूण १७ पानांसाठी रु.४२५/- इतके शुल्क आकारुन दि. १०.८.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली व अपिलकाराचा दि. २७.७.२००६ चा अर्ज निकाली काढला. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २९.१.२००७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नसल्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ०१ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता युपीसीने नोटीस पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.शांताराम बोधे यांनी माहितीच्या अधिकारात दि. २७.७.२००६ रोजी जन माहिती

अधिका-यांकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली.

(१) मुंबई उच्च न्यायालय, रिट पिटीशन २७५४ ९७ मधील अंतिम आदेशाच्या झेरॉक्स प्रतीसाठी आकारण्यात आलेल्या फी बाबत.

(२) मिळकत क्र. ४७९/१४ मधील मिळकतीसाठी आकारण्यात येणा-या कराबाबत.

(३) अपिलीय प्राधिकारी यांचे नांव, हुद्दा आणि संपूर्ण पत्ता.

वरील माहितीबाबत जन माहिती अधिका-यांनी दि. १०.८.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन) पुणे विभाग यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन प्रतिवादी यांना जादा आकारणी केलेली रक्कम रु.४०८/- ही अपिलकार यांना १० दिवसांत परत दयावी या निर्णयाची समज संबंधितांना देण्यात यावी असे दिनांक २९.१.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी/ मुख्य अधिकारी, पांचगणी यांनी दि. २९.१.२००७ रोजी अपिलकारास रु.४०८/-इतक्या रकमेचा धनादेश पाठविला. अपिलकारास पाचणी नगर पालिकेने दिलेला धनादेश आय.डी.बी.आय.बँकेत वठला नाही ही बाब जन माहिती अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिली. जन माहिती अधिका-याने दिनांक २०.६.२००८ रोजी रु.४०८/- रोखीने दिले. त्यामुळे अपिलकाराने दि. १४.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील परत घेतले आहे.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराकडून मागितलेल्या माहितीसाठी अधिक शुल्क आकारुन माहिती देण्यात आली. आकारण्यात आलेले अधिक शुल्क प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास परत देणेबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. जन माहिती अधिका-यांली अपिलकारास रु.४०८/- रोखीने दिले. त्यामुळे अपिलकाराने अपील परत घेतले.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४८६/०२**

**श्री. प्रविण सोलंकी,** **------अपीलकर्ता**
**केतकी को.ऑप.हौ.सोसा.मर्या.**
**ए/१५, तिसरा मजला,**
**जी.व्ही.स्किम रोड नं.२,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),पूर्व उपनगरे,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जुने वाहतूक गॅरेज इमारत,**
**पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव),पूर्व उपनगरे,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जुने वाहतूक गॅरेज इमारत,**
**पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०० ०७५.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. प्रवीण सोलंकी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव), पूर्व उपनगरे, पंतनगर, घाटकोपर, मुंबई यांचेकडे दि.१२.१.२००७ रोजी अर्ज करुन मुलूंड यशवंत को.ऑप.हो.सोसा.मर्या. बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक (अभियांत्रिकी सेवा आणि प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य कार्यालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल करण्याऐवजी अपिलकाराने प्रथम अपील जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारती प्रस्ताव), यांचेकडे दि.१०.२.२००७ रोजी दाखल केले. विशिष्ट अशी मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने दिनांक १६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही जन माहिती अधिकारी सुनावणीसाठी हजर नव्हते. अपिलकार श्री.प्रवीण सोलंकी हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.प्रवीण सोलंकी यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता यांचेकडे दि. १२.१.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) सी.टी.सर्व्हे क्र.५९८ आणि ५९९ च्या प्लॉटवरील मुलूंड यशवंत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेला प्लॅन व सुधारित प्लॅन.

(२) बाल्कनीच्या क्षेत्रफळाचा समावेश करुन फ्लॅटचे कार्पेट क्षेत्रफळ किती, दिवाणखाना, शयनगृह, स्वयंपाकगृह इ. च्या क्षेत्रफळासह इमारतीच्या दुस-या मजल्याचे अे आणि बी विंगचा महानगरपालिकेने मंजूर केलेला प्लॅन व सुधारित प्लॅन.

(३) इमारतीच्या पहिला मजला ते पाचव्या मजल्यासाठी ओ.सी. (Occupation Certificate) पूर्ण अथवा अंशतः मंजूर केली याबाबतचे स्पष्टीकरण.

(४) अपिलकाराने दि. १४.८.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

(५) फ्लॅटच्या मालमत्ता कराची गणना कशी केली याबाबतचा सविस्तर तपशील.

अपिलकाराने वरीलप्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत दिली नाही. कालावधी उलटून गेल्यानंतर दिनांक १४.२.२००७ व दिनांक १.३.२००७ च्या पत्रान्वये अपूर्ण माहिती दिली. मागितल्याप्रमाणे विशिष्ट अशी माहिती दिली नाही. दरम्यानच्या कालावधीत अपिलकाराने जन माहिती अधिका-याकडेच दि. १०.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याचा पत्ता जन माहिती अधिका-याने दिनांक १.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविला होता.

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दिनांक १४.२.२००७ व १.३.२००७ च्या पत्रान्वये दिलेली माहिती व अपिलकाराने दि. १२.१.२००७ च्या अर्जान्वये दिलेल्या माहितीचे अवलोकन केले. यावरुन अपिलकारास मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनही सविस्तर माहिती दिलेली नाही असे दिसते. तरी या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासन ३० दिवसांचे आंत द्यावी.

**आदेश -**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई/दिनांक :-११/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४२९/०२**

**श्री. सुभाष वं.कुवर,** **------अपीलकर्ता**
**१९-१२६, उपवन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**शिवाई नगर, पोरखण रोड नं.१,**
**ठाणे - ४०० ६०६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नियंत्रक,**
**नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय,**
**रॉयल इन्शुरन्स इमारत, १४, ज.टा.मार्ग,**
**चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.**

**जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक,**
**नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय,**
**रॉयल इन्शुरन्स इमारत, १४, ज.टा.मार्ग,**
**चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. सुभाष कुवर यांनी जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय, चर्चगेट, मुंबई यांचे कडे दि. ७.९.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकारास दि.१.१०.२००५ पासून वार्षिक वेतनवाढ देय असून, ती अद्याप कां देण्यात आली नाही अशी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ९.१०.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा नियंत्रक, शिधावाटप अधिकारी यांच्याकडे दि.१०.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुनही आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा नियंत्रक शिधावाटप अधिकारी, श्री.यशवंत केसरे, जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक, शिधावाटप, श्री.मधुकर बोडके, तसेच अपिलकार श्री.सुभाष कुवर हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.सुभाष कुवर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक, शिधावाटप यांच्याकडे दि.७.९.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(अ) अपिलकारास दि.०१.१०.२००५ पासून वार्षिक वेतनवाढ देय असूनही अद्याप कां देण्यात आली नाही ?

(ब) अपिलकाराने उ.नि.शि.ई.परिमंडळ यांना पाठविलेल्या पत्रे/ स्मरणपत्रे व उ.नि.शि.ई. परिमंडळ यांनी आपल्या कार्यालयास पाठविलेलया पत्रे/स्मरणपत्रांवर आतापर्यंत काय कार्यवाही करण्यांत आली ?

(क)अपिलकारास वेतनवाढ न देण्यामागे किंवा वेतनवाढ देण्यास विलंब लावण्यामागे अपिलकाराचे आर्थिक नुकसान करुन त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे काय ?

(ड) या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण पत्रव्यवहार व टिप्पणीच्या/ आदेशा च्या प्रमाणित छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

वरीलप्रमाणे अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिका-यांनी दि. ९.१०.२००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती अपिलकारास उपलब्ध करुन दिली. यावरुन अपिलकार निलंबित आहेत. निलंबित कालावधीत कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात आलेली नाही. निलंबित कालावधी संपुष्टात आणून पुनर्स्थापित केलेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ३६ नुसार क्रमप्राप्त वेतनवाढ देणे योग्य राहिल असे नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी अभिप्राय दिले. सदर स्पष्टीकरण लक्षात घेता जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेले उत्तर समर्पक वाटते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u> -**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४३८/०२**

**श्री. शिवाजी संभाजी बोईनवाड, ------अपीलकर्ता**
**सी-२०२/१२, सागर को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प.)**
**मुंबई - ४०० ०६७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप निबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**सी-२०२/१२, सागर को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प.)**
**मुंबई - ४०० ०६७. ------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. शिवाजी संभाजी बोईनवाड यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव, सी-२०२/१२, सागर को.ऑप.हौ.सोसा.लि.सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प.)मुंबई, यांचेकडे दि.३०.११.२००५ रोजी अर्ज करुन सदर सोसायटीच्या कामकाजाबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलकाराने दि.१४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.६.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ०३.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांच्या वतीने सहकारी अधिकारी तसेच अपिलकार श्री.शिवाजी बोईनवाड हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.शिवाजी बोईनवाड यांनी माहितीच्या अधिकारात दि. ३०.११.२००५ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, सी-२०२/१२, सागर को.ऑप.हौ.सोसा.लि.सेक्टर-२, चारकोप, कांदिवली यांचेकडे अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" सी-२०२, सागर सोसायटी सेक्टर II चारकोप कांदिवली (प.) मुंबई-६७ या सोसायटीच्या कारभाराबाबत कांदिवली (प.) पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्री. कुंभार यांनी पंचनामा करुन सोसायटीच्या सचिवांनी कार्यभार धारण केल्यापासूनची सोसायटीच्या आर्थिक व्यवहाराची सविस्तर माहिती, संस्थेची बँकेतील शिल्लक रक्कम, संस्थेचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, सर्व उत्पन्नाचे स्त्रोत, जसे, मेंटेनन्स, गाळयाच्या पुर्नविक्री धारकाकडून मिळणारी देणगी, इ.संस्थेची मिळकत सस्पेन्समध्ये का ठेवली, याची कारणे काय ? इ. अनुषंगिक माहिती मागितली."

जन माहिती अधिकारी तथा सचिव, सागर को.ऑप.हौ.सोसा,लि. कांदिवली यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.१४.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्यांत यावी. संस्थेला त्याप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि.१६.१०.२००६ च्या पत्रान्वये कळविले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देवूनही जन माहिती अधिकारी तथा सचिव, सागर को.ऑप. हौसिंग सोसासयटी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सचिव, सी-२०२, सागर सहकार गृहनिर्माण संस्था यांचेकडे संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबत माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी संस्थेच्या सचिवांना दि. १६.१०.२००६ च्या पत्रान्वये आदेशित केले होते. तरीही अपिलकारा माहिती देण्यात आली नाही. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी तथा सचिव, सी- २०२, सागर सहकार गृहनिर्माण संस्था यांना आदेश देतो की, सदर आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी तथा सचिव, सी- २०२, सागर सहकार गृहनिर्माण संस्था यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-०३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४४९/०२**

**श्री. विजय सी.मेहता,** **------अपीलकर्ता**
**एस.व्ही.एम.इंजिनियर्स प्रायव्हेट लि.**
**२६५, शिवशक्ती इंडस्ट्रियल इस्टेट,**
**ऑफ एम.व्ही.रोड, अधेरी (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त, झोन-१२,**
**शैलेंद्रनगर, दहिसर (पूर्व), मुंबई-४०० ०६८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,**
**कांदिवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. विजय सी.मेहता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष, मुंबई यांचेकडे दि.१७.४.२००६ रोजी अर्ज करुन २००१ ते २००४ या कालावधीतील सहायक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-८, मुंबई यांनी दि.२९.९.२००२ च्या अनुषंगाने पाठविलेल्या अहवालाची प्रत मागितली होती. जन माहिती अधिका-याने समाधानकारक माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.५.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांच्या वतीने श्री.प्रवीण कदम, सहायक पोलीस निरीक्षक हे हजर होते. सुनावटीची नोटीस युपीसीने दि.२३.६.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, श्री.जयप्रकाश जाधव यांचा सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.विजय मेहता यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांचेकडे दि.१७.४.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-८, मुंबई यांनी सह पोलीस आयुक्त (का.व सु.) यांना पत्र क्र.पो.आ./ कक्ष-१२/फाईल क्र.१०७/०२, दिनांक २९.८.२००२ च्या अनुषंगाने पाठविलेला अहवाल तसेच सहायक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, मुंबई यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे पोलीस ठाणे तसेच तपासी अधिकारी यांचे घेतलेले स्पष्टीकरण व त्या संदर्भातील पाठविण्यात आलेल्या अहवालाच्या प्रतींची मागणी केली होती. "

अपिलकाराने मागितलेली माहिती आरे पोलीस ठाण्याशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी त्यांचेकडून अहवाल मागितला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे पोलीस ठाणे, मुंबई यांनी दि. ११.५.२००६ रोजी दिलेली माहिती अपिलकाराच्यावतीने श्री.राममूर्ती यांना दि. ४.११.२००६ रोजी दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, झोन-२, शैलेंद्रनगर, दहिसर (पूर्व), मुंबई-६८ यांचेकडे दि. ४.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष मुंबई यांनी अपिलकारास पुढीलप्रमाणे कळविले.

> " आपण मागणी केलेले संदर्भाधीन पत्र No.CP/DESK-12/F-No.107/02, दिनांक २९..२००२ च्या पत्राच्या अनुषंगाने मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१० (पूर्वीचे परिमंडळ-८), मुंबई यांनी मा. सह पोलीस आयुक्त, (का.व सु.) मुंबई यांना सादर केलेल्या अहवालाच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१० (पूर्वीचे परिमंडळ-८) मुंबई तसेच प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१२, पोलीस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई यांचे कार्यालयाशी पत्र व्यवहार केला असून त्याचे अभिलेखावर संदर्भाधीन अहवाल मिळून आलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी."

सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ५.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता दिनांक २७.१.२००७ रोजी कक्ष-१२ (अर्ज शाखा) येथे लागलेल्या आगीमध्ये ब-याचशा नस्ती जळून नष्ट झाल्याने अपिलकाराने नमूद केलेले दि.२९.८.२००२ चे पत्र उपलब्ध होऊ शकत नाही असे परिमंडळ १०, १२ च्या पोलीस उप आयुक्तांनी अभिप्राय दिले आहेत, ही बाब पटत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेले कागदपत्र एक विशेष शोध मोहीम घेऊन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावेत. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४४२/०२**

**श्री. गोविंदराज व्यंकटेश नाईक, ------अपीलकर्ता**
**१५/ए, दत्तकृपा बंगला,**
**आदर्श विद्यामंदिर शाळेसमोर,**
**मु.पो.कुळगांव, बदलापूर.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नियंत्रक,**
**वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०० ०२१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक,**
**वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई,**
**शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०० ०२१. ------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. गोविंदराज व्यंकटेश नाईक यांनी दि. २५.७.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक,वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे अर्ज करुन अपिलकाराच्या वेतनवाढी संबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने दि.२५.८.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.९.२००६ च्या पत्रान्वये चुकीची माहिती दिली. निर्णयाच्या टिप्पणीची प्रत दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ४ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक नियंत्रक, वैधनमापन शास्त्र, श्री.एन.जे.पाटील, तत्कालिन सहायक नियंत्रक, श्री.एम.के.खैरनार तसेच अपिलकार श्री. गोविंदराज नाईक हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्र्ांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.गोविंदराज नाईक यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक, वैधनमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, कुटीर क्र.७, मुंबई यांच्याकडे दि. २५.७.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहित मागितली होती.

" मुंबई महानगर विभागातून आलेले अपिलकाराचे दि.१७.१२.२००५ व २८.१२.२००५ चे अर्ज, उप नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई महानगर विभाग यांचे दि.१६.१.२००६ चे पत्र व त्यावरील अभिप्राय तसेच त्या अनषंगाने लेखा विभागाने क्र.वैमाशा-५/लेखा/गोव्यंना/वावेबा/०६, दि.२७.२.२००६ रोजी सादर केलेली टिप्पणी व त्यावर झालेल्या कारवाईचा तपशील याची माहिती मागितली होती." जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.९.२००६ च्या पत्रान्वये चुकीची अपूर्ण माहिती दिली. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपिलकार श्री.नाईक यांना हे विनापरवानगी गैरहजर होते. त्यांना दि. ८.११.२००० पासून निलंबित करण्यांत आले होते. त्यांच्याविरुध्द दि. २५.१०.२००१ रोजी दोषारोपपत्र बजावण्यात आले. त्यांना दि. १.११.२००१ पासून सेवेत पुनर्स्थापित करण्यात आले. त्यांचा निलंबन कालावधी नियमित करण्यात आला नाही इत्यादी माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास दि. ३०.९.२००६ च्या पत्रान्वये दिली. यावरुन असे दिसून येते की, अपिलकाराने मागणी केलेली माहिती अपिलकारास देण्यात आलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासू ३० दिवसांचे आंत अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती द्यावी.

**आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४५०/०२**

**श्री. दिपक शेलार,** **------अपीलकर्ता**
**२०२, चर्चगेट चेंबर,**
**५, न्यु मरिन लाईन्स, मुंबई-२०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. दिपक शेलार यांनी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे दि.३०.१०.२००६ रोजी अर्ज करुन अखिल महाराष्ट्र अपंग विकास महासंघाने हिशोब पत्रके सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयास सादर केली नाहीत याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि.१ ऑगस्ट,२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने दि.३०.१०.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने दि.२५.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ४ जुलै,२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता युपीसीने दि.२३.६.२००८ रोजी पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.दिपक शेलार यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अखिल महाराष्ट्र अपंग विकास महासंघ नोंदणी क्र.एच-१७६४९८, मुंबई यांना सन १९९५-९६ चा वार्षिक लेखा अहवाल

सादर केला असल्यास त्याच्या प्रतीची अपिलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे अपिलकारास दि. १.८.२००६ च्या पत्रान्वये कळविले.

" संबंधित कार्यालयातील रेकॉर्ड तपासून पहाता उपरोक्त न्यासाचे विश्वस्तांनी १९९५-९६ ते ३१.३.२००६ अखेरपर्यंतची हिशोब पत्रके या कार्यालयात दाखल केल्याचे दिसून येत नाही. विश्वस्तांना लेखा शाखेकडून ताबडतोब स्मरणपत्र पाठविण्यात येत असून हिशोब दाखल न झाल्यास पुढील कारवाई केली जाईल. "

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५ जानेवारी,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता अखिल महाराष्ट्र अपंग विकास महासंघाच्या सन १९९५-९६ च्या वार्षिक लेखा अहवालाच्या प्रतीची अपिलकाराने मागणी केली होती. परंतु, जन माहिती अधिका-याले मागणीप्रमाणे अपिलकारास माहिती दिली नाही. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार श्री. दिपक शेलार हजर नव्हते. तेव्हा महासंघाच्या सन १९९५-९६ च्या वार्षिक लेखा अहवालाची अपिलकारास प्रत देण्यात आली किंवा कसे हे समजून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलकारास माहिती दयावी.

**आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४२२/०२**

**श्री. अजित शंकर महाडिक,** **------अपीलकर्ता**
**३०/अ (मागील बाजू), कामगार नगर,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन),**
**दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**प्रशासकीय इमारत, खान अब्दूल गफार खान मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**दुग्धशाळा विज्ञान संस्था यांचे कार्यालय,**
**आरे, गोरेगांव, मुंबई- ४०० ०६५.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. अजित महाडिक यांनी दि. १३.३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन प्राचार्य, दुग्ध विज्ञान संस्था, आरे या पदावर रुजू झाल्यापासून कोणकोणत्या कालावधीत रजेवर किंवा फिरस्तीवर होते आणि इतर अनुषंगिक माहिती मागितली आहे. जन माहिती अधिका-यांली अपिलकारास दि. १८.३.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय, वरळी, मुंबई यांच्याकडे दि. १.४.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०२ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने दि.२०.६.२००८ रोजी नोटीस पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री.अजित महाडिक सुनावणीसाठी हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अजित महाडिक यांनी माहितीच्या अधिकारा जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांच्याकडे दि. १३.३.२००६ रोजी अर्ज करुन प्राचार्य दुग्घ विज्ञान संस्था, आरे यांच्या रजेबाबत, त्यांच्या दौ-याबाबत तसेच न्यूझिलंड वसतीगृहात वास्तव्य केल्याबाबत, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १८.३.२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यावरुन अपिलकाराने प्राचार्य, दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आरे यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली असल्यामुळे सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता दुग्धशाळा विज्ञान संस्थेचे जन माहिती अधिकारी/ प्राचार्य यांच्याकडे अर्ज करावा असे कळविले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे यांच्याकडे दि.१३.३.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागितली. जन माहिती अधिका-यांनी दि. ३ ऑगस्ट, २००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण खरी माहिती दिली नाही. दिलेली माहिती अपुरी/ खोटी आढळून आली. कागदपत्रे दिलेली नाहीत. माहिती देताना टाळाटाळ, विलंब केला. म्हणून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २४.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. दि. ६.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा प्रा.दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आसरे यांनी अपिलकारास १५ दिवसांत माहिती द्यावी असे आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६ मार्च, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे दिनांक ३ ऑगस्ट,२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिलेली नाही, असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u> -**

**सबब अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४२३/०२**

**श्री. अजित शंकर महाडिक,** **------अपीलकर्ता**
**३०/अ (मागील बाजू), कामगार नगर,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन),**
**दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**प्रशासकीय इमारत, खान अब्दूल गफार खान मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**दुग्धशाळा विज्ञान संस्था यांचे कार्यालय,**
**आरे, गोरेगांव, मुंबई- ४०० ०६५.** **------उत्तरवादी**

**<u>- वि वे च न -</u>**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. अजित महाडिक यांनी दि. १३.३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई यांच्याकडे अर्ज करुन प्राचार्य, दुग्ध विज्ञान संस्था, आरे या पदावर रुजू झाल्यापासून कोणकोणत्या कालावधीत रजेवर किंवा फिरस्तीवर होते आणि इतर अनुषंगिक माहिती मागितली आहे. जन माहिती अधिका-यांली अपिलकारास दि. १८.३.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय, वरळी, मुंबई यांच्याकडे दि. १.४.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०२ जुलै, २००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने दि.२०.६.२००८ रोजी नोटीस पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री.अजित महाडिक सुनावणीसाठी हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अजित महाडिक यांनी माहितीच्या अधिकारा जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन) दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांच्याकडे दि. १३.३.२००६ रोजी अर्ज करुन प्राचार्य दुग्घ विज्ञान संस्था, आरे यांच्या रजेबाबत, त्यांच्या दौ-याबाबत तसेच न्यूझिलंड वसतीगृहात वास्तव्य केल्याबाबत, इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १८.३.२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यावरुन अपिलकाराने प्राचार्य, दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आरे यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली असल्यामुळे सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता दुग्धशाळा विज्ञान संस्थेचे जन माहिती अधिकारी/ प्राचार्य यांच्याकडे अर्ज करावा असे कळविले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे यांच्याकडे दि.१३.३.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागितली. जन माहिती अधिका-यांनी दि. ३ ऑगस्ट, २००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण खरी माहिती दिली नाही. दिलेली माहिती अपुरी/ खोटी आढळून आली. कागदपत्रे दिलेली नाहीत. माहिती देताना टाळाटाळ, विलंब केला. म्हणून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २४.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ३.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली. दि. ६.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा प्रा.दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आसरे यांनी अपिलकारास १५ दिवसांत माहिती द्यावी असे आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६ मार्च, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे दिनांक ३ ऑगस्ट,२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिलेली नाही, असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u> -**

**सबब अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/४२४/०२**

**श्री. अजित शंकर महाडिक,** **------अपीलकर्ता**
**३०/अ (मागील बाजू), कामगार नगर,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त(प्रशासन),**
**दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**प्रशासकीय इमारत, खान अब्दूल गफार खान मार्ग,**
**वरळी, मुंबई- ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**दुग्धशाळा विज्ञान संस्था यांचे कार्यालय,**
**आरे, गोरेगांव, मुंबई- ४०० ०६५.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री. अजित महाडिक यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे, गोरेगांव, मुंबई यांच्याकडे दि.१८.३.२००६ रोजी अर्ज करुन विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल, शिष्यवृत्ती, दुग्धशाळा विज्ञान संस्थेतील कर्मचारी/ अधिकारी यांची रजा, वेतन इ.बाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), दुग्ध व्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई यांच्या कडे दि. २२.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३.११.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.०२.०७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता युपीसीने दि. २०.६.२००८ रोजी नोटीस पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर राहिले नाहीत. अपिलकार श्री.अजित महाडिक हे सुनावणीसाठी हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराने केलेले प्रतिपादन व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अजित महाडिक यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे, गोरेगांव, मुंबई यांच्याकडे दि.१८.३.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली.

(१) गेल्या पाच वर्षात शैक्षणिक सहलीमध्ये न गेलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींची नांवे, त्यांची सहलीस न जाण्याची कारणे, संबंधितांची पूर्ण सहल आगाऊ रक्कम केव्हा परत दिली, पूर्ण रक्कम परत न देण्याची कारणमिमांसा याबाबत सविस्तर माहिती.

(२) द्वितीय वर्ष विद्यर्थ्यांच्या सहलीमधील प्रमुख अचानक वैयक्तिक कारणामुळे सहलीमधून बाहेर पडले. सहलीमधून निवृत्त झालेल्या सदस्यांऐवजी इतरांची नेमणूक व्यवस्थेबाबत काय कार्यवाही झाली, सहलीमधून निवृत्त दिलेल्या सहल प्रमुखांनी नियमानुसार रजा अर्ज दिले आहेत काय, याबाबतची सविस्तर माहिती, कागदपत्र, फोटोप्रती.

(३) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-यांमार्फत दिल्या जाणा-या सर्व प्रकारच्या राखीव गटातील विद्यार्थ्यांना मिळणा-या शिष्यवृत्ती/ निर्वाहभत्ता रकमेचे धनादेश संस्थेस प्राप्त झाल्यानंतर किती दिवसांनी व कशा प्रकारे विद्यार्थ्यांना वाटप झाले, उशिरा वाटप झाल्याची जबाबदारी कोणावर टाकण्यात आली. ज्यांची शिष्यवृत्ती अद्याप मिळालेली नाही त्याबाबत काय पाठपुरावा करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २००३ ते २००६ या तीन वर्षाची माहिती द्यावी.

(४) एप्रिल, २००५ ते मार्च, २००६ या कालावधीत दुग्ध विज्ञान संस्थेतील जे अधिकारी/ कर्मचारी दिर्घ रजेवर होते त्यांनी रजेचे अर्ज अगोदर अथवा नंतर सादर केलेले आहेत, त्यांचे त्या कालावधीचे वेतन कोणत्या प्रकारे व कधी अदा करण्यांत आले. रजा नंतर मंजूर करण्यापूर्वी त्यांना वेतन अदा केले की रोखून ठेवले याबाबतची सविस्तर माहिती द्यावी.

अपिलकाराने वरीलप्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) वरळी, मुंबई यांच्याकडे दि. २२.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १३.१०.२००६ रोजी सुनावणी घेऊन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ६.१२.२००६ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशानुसार अपिलकारास १५ दिवसांच्या आत मागणी प्रमाणे माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे यांना आदेशित करण्यांत आले. तरीही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्यामुळे अपिलकाराने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगा कडे दि. ६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवचेन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आरे येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली, मागासवर्गी विद्यार्थ्यांस अनुज्ञेय असलेले शिष्यवृत्तीचे वाटप, तसेच संस्थेतील कर्मचा-यांच्या रजा व वेतनाबाबत अशी विशिष्ट माहिती मागितली आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक ती माहिती १५ दिवसांच्या आत देण्याबाबत दि.६.१२.२००६ च्या आदेशान्वये आदेशित करुनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, जन माहिती अधिका-याने अपिलकारास मागणी प्रमाणे आवश्यक ती माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. भविष्यात माहितीच्या अर्जावर आवश्यक ती कार्यवाही विहित कालावधीत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश -**

**सबब अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५४२/०२**

**डॉ. नागेंद्र टी. पांडे,** **------अपीलकर्ता**
**२, सुरेंद्र जे सिंग चाळ,**
**शिवाजीनगर, कुरार गाव,**
**मालाड (पूर्व), मुंबई-४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------उत्तरवादी**

**अध्यक्ष/ सचिव, मालाड शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**कुरारगांव, मालाड, मुंबई.**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार डॉ.नागेंद्र टी.पांडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. ३.११.२००६ रोजी अर्ज करुन मालाड शिवाजीनगर को.ऑप.हौ.सोसा.लि. या संस्थेच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांची यादी व अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई सहकारी संस्था आणि विभाग सुधारणा मंडळ (म्हाडा), वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.१२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.०१ मार्च,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.२३.७.२००८ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था श्री.बी.के.हांडे तसेच अपिलकार डॉ.नागेंद्र पांडे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार डॉ.नागेंद्र पांडे यांनी माहितीच्या अधिकारात दि.३.११.२००६ रोजी जन माहितील अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था (म्हाडा), मुंबई यांच्याकडे अर्ज करुन मालाड, शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांची यादी तसेच संस्थेच्या सर्वसाधारण सदस्यांची यादी, संस्थेच्या प्लॉटचे क्षेत्रफळ इ. अनुषंगिक माहिति मागितली होती. अपिलकाराने मागितलेली माहिति ही संस्था पातळीवरील असल्यामुळे ती संस्थेकडून घेण्यात यावी. तशा सूचना संस्थेला देण्यात येत आहेत असे जन माहिति अधिका-यांनी दि. ८.११.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. त्यामुळे अपिलकाराचे समाधान झाले नसल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, यांच्याकडे दि. १२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.०१ मार्च,२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवचेन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने मालाड शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांची यादी, संस्थेच्या सर्वसाधारण सदस्यांची यादी, संस्थेंच्या प्लॉटचे क्षेत्रफळ इ. अनुषंगिक माहिति मागितली आहे. सदर माहिति संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घेण्याबाबत अपिलकारास जन माहिति अधिका-याने दि. ८.११.२००६ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर समर्पक वाटते. जन माहिती अधिका-यांच्या उत्तराप्रमाणे अपिलकाराचे संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांकडे माहिती मागितली असता संस्थेच्या कार्यकारी समितीच्या तसेच संस्थेच्या सर्वसाधारण सदस्यांची यादी देण्यास नकार दिला असल्यामुळे अपिलकाराने दि. १.१२.२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांना कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अध्यक्ष/ सचिव, मालाड शिवाजीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुरारगाव, मालाड, मुंबई यांनी अपिलकारास मागितलेली माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**<u>आदेश</u> -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५५४/०२**

**श्री. अर्जुनलाल एम.छाब्रिया,** **------अपीलकर्ता**
**बेल्ले विस्ता, फ्लॅट नं.१३, तिसरा मजला,**
**तलाव व एल.आय.सी.कार्यालयासमोर,**
**एस.व्ही.रोड,वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**जी/उत्तर महापालिका विभाग कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (प.), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आरोग्य अधिकारी,**
**जी/उत्तर महापालिका विभाग कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, दादर (प.), मुंबई.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.अर्जुनलाल एम.छाब्रिया यांनी दि. २७.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय, दादर यांच्याकडे श्री. कमलुद्दीन सैय्यद हे गौसिया उपहारगृह विना परवानगी चालवित असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकारांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, महानगरपालिका, जी/उत्तर विभाग कार्यालय, दादर यांच्याकडे दि.२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक आरोग्य अधिकारी, डॉ.म.के.कुमठेकर हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने दि. ७.७.२००८ रोजी पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अर्जुनलाल छाब्रिया यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहायक आरोग्य अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००६ रोजी अर्ज करुन श्री.कमलुद्दीन सैय्यद हे विना परवानगी जी/उत्तर विभागात गौसिया उपहारगृह चालवित असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांच्याकडे दि. २.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक आरोग्य अधिकारी यांनी लेखी अहवाल सादर केला. यावरुन जन माहिती अधिका-यांनी, मागितलेल्या एकूण ९ मुद्दयांबाबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह अपिलकारास दि. १९.७.२००८ रोजी मागणीप्रमाणे माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्यात आली आहे. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, भविष्यात माहितीच्या अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याबाबतची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**रामाआ-२००८/तक्रार क्र.२६/०२**

**श्री. दिपक सी.मोदी,** **------तक्रारदार**
**फ्लॅट नं.जे-७०१, पंचशिल गार्डन,**
**जे.के.एल.एम.एन.को.ऑप.हौसिंग सोसा.लि.**
**सीटीएस १२८/ए-४७, पंचशिल एन्केल्व,**
**महावीर नगर, कांदिवली (प.), मुंबई.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**पश्चिम उपनगरे, पी आणि आर विभाग,**
**पहिला मजला, डॉ.आंबेडकर मंडई,**
**नारायण जोशी मार्ग, कांदिवली (प.)**
**मुंबई- ४०० ०६७.**

**-----उत्तरवादी**

**-वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये श्री. दिपक सी.मोदी यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका कांदिवली, मुंबई यांचेकडे दि. २१.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

"महावीरनगर कांदिवली (पश्चिम) येथील सी.टी.सर्व्हे क्र.१२८ ओ/४६, १३८-ओ/४६/१ आणि सी.टी. सर्व्हे क्र.१२८-ओ/४७ वरील बांधकाम केलेल्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली होती."

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने तक्रारदार श्री.दिपक मोदी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.३.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता (इमारती प्रस्ताव), आर/एस विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका हे हजर होते. यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही तक्रारदार श्री. मोदी हे हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी असे प्रतिपादन केले की, तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रती तक्रारदारास दि. २१ जुलै, २००८ रोजी देण्यात आल्या आहेत. मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्र मिळाली असल्याचे तक्रारदार श्री.मोदी यांनी दिनांक २१ जुलै, २००८ रोजी आयोगाकडे फॅक्स पाठवून कळविले आहे. सदर वस्तुस्थिती लक्षात घेऊन मी या प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश -**

**सबब तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य,बृहन्मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक-३१०/०२**

**श्री. हरिश्चंद्र श्रीधर पेडणेकर,**
**३५/२३, बी.डी.डी.चाळ,वरळी,**
**मुंबई-४०० ०१८** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक,**
**विकास विभाग चाळी, वरळी,मुंबई-१८**

**२)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**विकास विभाग चाळी,**
**वरळी, मुंबई-१८** **------- उत्तरवादी**

**- <u>विवेचन-</u>**

श्री.हरिश्चंद्र श्रीधर पेडणेकर, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली वरळी बी.डी.डी.चाळ क्रमांक ३४ ते ४० च्या मागील बाजूने जाणारा रस्त्यावर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाविषयी माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व प्रथम अपीलीय प्राधिका-यांचे आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले,ज्याची दिनांक १८/६/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.सुनावणीला उत्तरवादी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

बी.डी.डी. चाळ क्रमांक ३३ व ३४ मधून व पोलीस सशस्त्र दल ल-२ विभागाकडे जाणारा व त्यास लागून बी.डी.डी. चाळ क्रमांक ३४ ते ४० च्या पाठीमागील बाजूने जाणारा रहादारीचा रस्ता अडवून अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे. सदर अनधिकृत बांधकामाला व्यवस्थापक मुंबई विकास विभाग चाळी यांची व शासनाची मान्यता आहे किंवा नाही याबाबतची माहिती अपीलकारांनी जनमाहिती अधिकाऱ्याना विचारली होती.सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्या दिनांक ५/८/२००६ च्या पत्रान्वये या अनधिकृत बांधकामाला पूर्वमान्यता देण्यात आलेली नाही अशी अपीलकाराला माहिती दिलेली आहे.

माहितीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला दिलेली आहे. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी मात्र आदेश पारित केलेले नाहीत.सबब यापुढे प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी

प्रथम अपीलावर सुनावणी घेउन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी.अशी समज देण्यात येत आहे. जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती दिली असल्यामुळे मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**-निर्णय-**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १/७/२००८**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य,बृहन्मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक-२००८/३३९/०२**

**श्रीमती संजीवनी रमेश पवार,**
**व्दारा श्री.डी.टी.फणसे,**
**ए-४४, पाम एकर्स सी.एच.एस.महात्मा फुले रोड,**
**मुलुंड (पू) मुंबई-४०० ०८१** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा चिफ पर्सोनेल ऑफीसर,**
**बेस्ट यु/टी , बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,मुंबई-४०० ००१**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**बेस्ट यु/टी , बेस्ट भवन, बेस्ट मार्ग,मुंबई-४०० ००१** **------- उत्तरवादी**

**- विवेचन-**

श्रीमती संजीवनी रमेश पवार,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५खाली बेस्ट U/T कार्यालयाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सदर अधिनियमाविषयी कर्मचा-यांना दिलेली माहिती, कार्यालयाने जनमाहिती अधिका-यांच्या केलेल्या नेमणूका, या कायदयाच्या अनुषंगाने कर्मचा-यांना माहिती देण्याविषयी कार्यालयाने केलेले प्रयत्न इ.बाबतची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी माहिती न दिल्यामुळे व प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आदेश पारित न केल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले,ज्याची दिनांक २०/६/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व जनमाहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारांनी माहितीचा अधिकार अधिनियम२००५ च्या अंमलबजावणीच्या दृष्टीने बेस्ट U/T कार्यालयाने कर्मचा-यांना माहिती का देण्यात आली नाही, त्यासाठी किती वेळ लागणार आहे,या अधिनियमाविषयी कर्मचा-यांना माहिती मिळण्यासाठी कार्यालयाने कोणते प्रयत्न केले, नेमणूक करण्यात आलेले जनमाहिती अधिकारी इ.माहिती मागितली होती. एकंदर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विषयी कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीविषयी अर्जदाराने माहिती मागितली होती. जनमाहिती अधि का-यांनी सुनावणीदरम्यान सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार बेस्ट उपक्रमाकडून त्यांच्या वेबसाईट वरुन जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करून दिली जाते. अधिनियमाची जास्तीत जास्त माहिती

होण्याकरिता बेस्ट उपक्रम वेळोवेळी सेमिनार आयोजित करते. त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ७/११/२००५ च्या विभागीय परिपत्रकानुसार उपक्रमामार्फत नेमण्यात आलेल्या जनमाहिती अधिका-यांची व प्रथम अपीलीय प्राधिका-यांची माहिती सर्व कर्मचारी / अधिका-यांना त्यांच्या विभागाप्रमुखामार्फत/ शाखाप्रमुखामार्फत देण्यात आलेली आहे. जनमाहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेले निवेदनाचे व त्यासोबतचे संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले असता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत बेस्ट उपक्रमाकडून अपेक्षित कार्यवाही झाल्याचे दिसून येते. अपीलकार हे बेस्ट उपक्रमांतर्गत असलेल्या कार्यालयाचेच कर्मचारी असल्यामुळे वर नमूद माहिती त्यांच्या विभाग/शाखाप्रमुख यांच्याकडून मिळणे ग्रहीतच आहे. त्यामुळे वेगळयाने जनमाहिती अधिका-यांनी यासंदर्भात त्यांना माहिती देण्याची आवश्यकता नाही.

**-निर्णय-**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १/७/२००८**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, बृहन्मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक-२००८/३२५/०२**

**श्री. युसुफ तांबोळी,**
**सामाजिक न्याय मंच,शाहीन मंजिल,चौधरी डिस्पेन्सरी,**
**गांवदेवी डोंगरी, अंधेरी (पश्चिम)मुंबई-४०० ०५८** -------
**अपीलकार**

**विरूद्ध**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त ,**
**के/पश्चिम वॉर्ड ऑफीस,बृहन्मुंबई महानगरपालिका,अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई -४०० ०५८**
**२) जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई- ४०० ०५८** ------- **उत्तरवादी**

## - विवेचन-

श्री.युसूफ तांबोळी,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली अंधेरी (पश्चिम ) येथील डॉ विजय एन.देव क्लीनीक वरील शेडला बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीबाबत माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित न केल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले .ज्याची दिनांक १९/६/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते.

उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता, अर्जदाराने अंधेरी (प)येथील डॉ. विजय एन.कलीनीक,साईसदन बिल्डींग वरील शेडला महानगरपालिकेने परवानगी दिली आहे का व परवानगी दिली नसल्यास त्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने काय कार्यवाही केली , अशी माहिती विचारली होती.जनमाहिती अधिका-यांनी सदर शेडला परवानगी देण्यात आली नाही व त्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे अर्जदाराला कळविले आहे.तथापि या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी यावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत. ही गंभीर बाब आहे.सबब प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी त्यांच्याकडे दाखल झालेल्या अपीलावर सुनावणी घेउन आदेश पारित करण्याबाबत दक्षता घ्यावी , अशी सक्त ताकीद देण्यात येत आहे.

माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती दिली असल्यामुळे मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## -निर्णय-

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी )**
**दिनांक १/७/२००८** **राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई.**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य,बृहमुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक-२००८/१६७८/०२**

**श्री.नदीम एम.उमरभॉय,**
**नरिमा बिल्डींग, ६वा मजला**
**फॅलट १२ए, १६२ एम.के.रोड,मुंबई-४०० ०२१** **------अपिलकार**

**विरूद्ध**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**झोन-१ ,तिसरा मजला, ई वॉर्ड कार्यालय,**
**भायखळा, मुंबई-४०० ००८.**

**२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अ वॉर्ड,**
**बृहन्मुंबई महाागरपालिका,**
**फोर्ट,मुंबई-४०० ००१** **------उत्तरवादी**

**- <u>विवेचन-</u>**

श्री.नदीम एम.उमरभॉय, मुंबई यांनी सोना महल को.ऑप हौ. सोसायटी प्लॉट नं. २०३ बॅकबे रिक्लेमेशन येथील जाझ या रेस्टॉरंटच्या बांधकामाबाबत माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले . प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानंतरही जनमाहिती अधिका-यांकडून एका मुद्दयावर समाधानकारक माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले, ज्याची दिनांक १८/६/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी उपस्थित होते.

दोही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

बॅकबे रिक्लेमेशन स्कीम, प्लॉट नं.२०३ येथील गॅरेजेसचे आधिकृतरित्या रेस्टॉरंटच्या किचनमध्ये रूपांतर करण्यात आले, असे अपीलकाराचे म्हणणे आहे. या अनुषंगाने त्यांनी एकूण १२ मुद्दयावर जन माहिती अधिका-यांकडून माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांनी जनमाहिती अधिका-यांनी माहिती देण्याचे आदेशित केले. सुनावणीदरम्यानच जनमाहिती अधिका-यांनी अर्जदाराला माहिती दिल्याचे सांगितले. तथापि अर्जदाराने माहिती मिळाली नसल्याचे सांगितल्याने त्यांना पुन्हा माहिती दिली असल्याचे दिसून येते. तथापि जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीपैकी अपीलकाराने वर नमूद

बांधकामाच्या आषुंगाने सोसायटीने मा.उच्च न्यायालयाच्या आदेश सोबत जोडून बृहन्मुंबई कार्यालयाला २४ जाोवारी १९९८ रोजी पत्र पाठविले होते.मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वर नमूद बांधकाम कायम राहण्यासाठी जिल्हाधिकारी व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या परवानगीच्या अधीन राहून अनुमती देण्यात आली होती. सदर आदेशाच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे अनुपालन याबाबत अपीलकाराने माहिती विचारली होतीा. तथापि याबाबत जन माहिती अधिका-यांनी स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता नाही, असे अपीलकाराला उत्तर दिले आहे. या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकाराने आयोगाकडे अपील दाखल केले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या मुद्दयावर माहिती देता येत नसल्यास जन ामाहिती अधिका-यांची भूमिका योग्य आहे. मात्र या मुद्दयावर माहिती दिल्याने न्यायालयीन प्रकरणावर परिणाम होत नसल्यास सदर माहिती देण्यास हरकत नाही . तथापि ही बाब तपासून जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्याबाबत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती आयोगाला दयावी, असे आदेश देण्यात येत आहेत.

**-निर्णय-**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०७/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/५६७/०२**

**श्री. माधव गजानन देशपांडे,** **------अपीलकर्ता**
**७, कौस्तुभधाम को.ऑप.हौसिंग सोसा.लि.**
**२३, संघानी इस्टेट, गावदेवी रोड,**
**घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक,**
**भूमी अभिलेख, सिंधुदुर्ग.**

**जन माहिती अधिकारी तथा देवगड तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, देवगड, जि.सिंधुदुर्ग.** **------उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये अपिलकार श्री.माधव गजानन देशपांडे यांनी किल्ले देवगड गांव, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील सर्वे नं.२५ चे पोट हिस्से नं.४३, ४४, ४५, ५०, ६६ आणि आजूबाजूचे स्थान दर्शविणारा नकाशा इ.अनुषंगिक माहिती मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्था-३, जमावबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे दि.९.१२.२००६ रोजी अर्ज करुन माहिती मागितली होती. मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, सिंधुदुर्ग यांच्याकडे दि.२९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमिलेख, श्री.धायगुडे, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,भूमी अभिलेखक देवगड, श्री.श्रीरंग जाधव, तसेच अपिलकार श्री.माधव देशपांडे हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.माधव देशपांडे यांनी माहितीच्या अधिकारात दि.९.१२.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जमावबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे अर्ज करुन किल्ले देवगड गाव येथील सर्वे नं.२५ चे पोट हिस्से नं.४३,४४,४५,५०,६६ व आजूबाजूचे स्थान दर्शविणा-या नकाशाची प्रत मिळण्याबाबत मागणी केली होती. त्यानंतर अपिलकाराने जन माहिती अधिकारी तथा देवगड तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देवगड,जि.सिंधुदुर्ग यांचेकडे दि.१०.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढीलप्रमाणे सुधारित माहिती मागितली. "सर्व्हे नं.२५ मधील नमूद केलेल्या विषयांकित पोट

हिस्सा नं.४५ व ६६ यांना सर्व बाजूंनी लागून असलेल्या पोट हिश्श्याचे नकाशे मिळावेत. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याचा व जमिनीचा सदर रस्त्या पलिकडील काही पोट हिश्श्याच्या नकाशाची मागणी केली." जन माहिती अधिकारी तथा देवगड तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देवगड, जि.सिंधुदुर्ग यांनी पुढीलप्रमाणे दि. ९.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली.

" किल्ले देवगड गाव येथील सर्वे नं.२५ च्या अभिलेखात हिस्से पाडणेत आलेले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने मागणी केलेल्या हिस्सा क्रमांकाच्या नकाशाची नक्कल पुरविता येत नाही. सदर सर्वे क्रमांकामध्ये पाडणेत आलेले हिस्से महसूल विभागाने केलेले दिसून येते. अपिलकाराच्या अर्जाप्रमाणे देवगड किल्ला परिसरातील सर्वे नं.२५ व लगतच्या सर्वे नं.१०-अ, १३,१७,१८ व २० च्या नकाशाच्या प्रती अपिलकारास पुरविण्यात येतील. त्या कामी शुल्क रक्कम रु.१६८/- व सदरचे नकाशे पोस्टाने हवे असल्यास पोस्ट खर्च रु.३०/- कार्यालयाकडे पाठविल्यास त्या नकला अपिलकारास पुरविण्यात येतील असे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, देवगड यांनी अपिलकारास कळविले. "

तहसिलदार, देवगड यांच्या अभिप्रायानुसार सर्वे क्र.२५ मध्ये हिस्से पाडून ७/१२ तयार करण्यात आले आहेत. परंतु, त्यामध्ये किती हिस्से आहेत आणि त्याचे कब्जेदार कोण याची माहिती त्यांच्याकडे नाही. तसेच त्यामध्ये काही हिस्से सरकारी/ ग्रामपंचायत व सार्वजनिक बाबतचे दिसून येतात. याबाबतची माहिती भूमी अभिलेख कक्षाकडून देण्यात यावी. वरील हिश्शाची वहिवाटीप्रमाणे मोजणी करुन देण्याबाबतची कार्यवाही करुन नकाशे तयार करण्यात यावेत असे तहसिलदार, देवगड यांचे अभिप्राय आहेत. याबाबत तहसिलदार, देवगड यांनी तालुका भूमी अभिलेख (निरीक्षक) यांच्याशी पत्रव्यवहार केला असता ७/१२ मधील क्षेत्र हे किमान क्षेत्रापेक्षा कमी असल्यामुळे हिश्शाचे नकाशे करण्यात आले नाहीत, असे कळविण्यात आले आहे. यावरुन सर्वे नं.२५ मधील पोट हिश्शासंबंधी नकाशे तयार करण्यात आले किंवा कसे याचा उपलब्ध कागदपत्रावरुन बोध होत नाही. सरकारी जमिनीच्या हिश्श्याबाबत ७/१२ तयार करतेवेळी पोट हिश्शाचे नकाशे भूमी अभिलेख कक्षाकडून तयार करुन घेणे संबंधितांना बंधनकारक करण्यात यावे.

वरील विवेचन लक्षात घेता मी असे आदेश देतो की, किल्ले देवगड येथील सर्वे नं.२५ मधील हिश्शासंबंधी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी नकाशे तयार करुन अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत नकाशाच्या नकला उपलब्ध करुन दयाव्यात.

**आदेश -**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०७/२००८.**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य,बृहन्मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक- ३२१/०२**

**श्रीमती स्वाती कारंडे**
**के ३/९६, डीएन नगर,जेपी रोड,**
**अंधेरी (प) मुंबई-५८** **-------अपीलकार**

**विरूद्ध**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१**

**२)जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन-**

श्रीमती स्वाती कारंडे, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली डी.एन.नगर के-३ कोऑपहौ.सोसायटी अंधेरी या सोसायटीच्या संदर्भात या सोसायटीच्या पुर्नविकासाबाबत सोसायटीच्या मॅनेजिंग कमिटीकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाही तसेच यासंदर्भात सोसायटीकडून करण्यात आलेला पत्रव्यवहार इ.बाबतची माहिती मिळण्यासाठी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यानी प्रथम अपील दाखल केले.तथापि प्रथम अपीलीय प्राधिका-याने आदेश देउनसुद्धा माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले, ज्याची दिनांक १९/६/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला अपीलकार व उत्तरवादी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते.

उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता, अपीलकार राहत असलेल्या गृहनिर्माण संस्थेच्या Managing Committee कडून सोसायटीचा पुर्नविकास खाजगी बिल्डरकडून करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. मात्र हे करताना फलॅटधारकांच्या अधिकार, सुविधा , सुरक्षितता याबाबत विचार केला जात नाही.त्याअनुषंगाने माहिती मिळण्यासाठी अपीलकाराने जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज केला होता. जनमाहिती अधिका-यांनी सदर माहिती संस्थास्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून उपलब्ध करून घ्यावी असे